POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३९ ● मुंबई, रविवार, २१ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### कुठे किती झालं मतदान?

शनिवारी २३ नगरपरिषद आणि नगपंचायतींसाठी मतदान होत असून सकाळी ९.३० पर्यंत कुठे किती मतदान झालं त्याची आकडेवारी समोर आली आहे.

- वाशिम नगरपरिषदेमध्ये सकाळी पहिल्या टप्प्यात साडे नऊ वाजेपर्यंत ६.५३ टक्के मतदान झाले तर रिसोड नगर परिषद मधील २ प्रभागातील २ उमेदवारांसाठी 8.४१ टक्के मतदान झालं.
- तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सकाळी ७.३० ते ९.३० वाजेपर्यंत एकूण 8.92 टक्के मतदान झालं. फुलंब्री नगरपंचायतसाठी १२.४७ टक्के मतदान करण्यात आलं.
- अंबरनाथमध्ये सकाळी ९ वाजेपर्यत ७.५८ टक्के मतदान
- भुसावळ, यावल, सावदा येथे दहा वाजेपर्यंत ४.६ % मतदान झालं आहे. मतदान केंद्रावर शांततेने मतदान प्रक्रिया पार पडत आहे.
- चंद्रपूर : घुग्गुस नगर परिषदेसाठी पहिल्या दोन तासात ५.७ % मतदान झालं.

## कुठे पकडले शेकडो बोगस मतदार, तर कुठे मतदान यंत्रच ठप्प...
# राज्यातील मतदानाची स्थिती कशी आहे?

**■ बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह विविध जिल्ह्यांतील एकूण १४३ सदस्यपदांसाठी शनिवार (२० डिसेंबर) मतदान होत आहे. राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुका २ डिसेंबर रोजी पार पडल्या होत्या, मात्र पैकी २३ नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

अंबरनाथ, कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा, बारामती, फुरसुंगी-उरुळी देवाची, सोलापूरातील अनगर, मंगळवेढा, साताऱ्यातील महाबळेश्वर, फलटणसह २३ नगरपरिषदांमध्ये आज मतदान होत आहे. थंडीचे दिवस असल्याने सकाळी वातावरणात चांगलाच गारवा पहायला मिळाला, मात्र त्याचा मतदानावर फारसा परिणाम झालेला



दिसला नाही. आज सकाळपासून मतदारांचा मोठा उत्साह पहायला मिळत आहे.

मात्र मतदान होत असलेल्या काही ठिकाणी गौरप्रकार झाल्याने मतदानाला गालबोट लागल्याचं दिसून आलं. अंबरनाथच्या कोहोजगाव परिसरात एक खळबळजनक बातमी समोर आली. अंबरनाथमध्ये २०८ संशयित मतदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्या सर्वांची आधार कार्ड व पॅन कार्डद्वारे सखोल तपासणी करण्यात आली. हे नागरिक मतदानासाठी आले होते का, कोणासाठी मतदान करणार होते याचीही चौकशी करण्यात आली. संशयित बोगस मतदारांमुळे एकच गोंधळ उडाला. या सगळ्या प्रकारामुळे इथलं वातावरण तापलं होतं. अंबरनाथ नगर पालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चौदाशे पोलिसांचा फौज फाटा तैनात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ईव्हीएम मशीन प्रकरणात कुठलीही तक्रार नसल्याने या ठिकाणी गुन्हा कुठलाच दाखल नाही. पैसे वाटप संदर्भात देखील पोलिसांकडे कुठली तक्रार आलेली नाही, त्यामुळे अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

तर दुसरीकडे यवतमाळमध्ये एका मतदान केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचे आढळले. मतदाना केंद्राबाहेर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, मात्र एश्ट बिघडल्याने मतदान करता येत नसल्याने अनेक मतदार खोळंबले.

# अंबरनाथमध्ये २०८ बोगस मतदार
## भाजपाचा शिवसेना शिंदे गटावर आरोप, चौकशी सुरु

**■अंबरनाथ। प्रतिनिधी,**

राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह विविध जिल्ह्यांतील एकूण १४३ सदस्यपदांसाठी शनिवारी (२० डिसेंबर) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार असून राज्यातील अनेक मतदान केंद्रावर सकाळपासूनच मतदारांनी रांगा लावल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच अंबरनाथच्या कोहोजगाव परिसरातुन एक खळबळ उडवणारी बातमी समोर आली आहे. मतदानासाठी शेकडो महिलांची एका सभागृहात गर्दी जमली असून हे मतदार बोगस असल्याचा राजकीय पक्षांनी आरोप केलाय. या प्रकरणानंतर काँग्रेस आणि भाजपचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले असून इथलं वातावरण आता तापलं आहे.

**काँग्रेस व भाजप कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले, वातावरण तापलं**

अंबरनाथच्या कोहोजगाव परिसरात एका सभागृहात मोठ्या प्रमाणात पहाटेच्या सुमारास



महिला आणि पुरुष जमले होते. हे सगळे लोक बोगस मतदान करण्यासाठी आणले असल्याचा आरोप काँग्रेस व भाजपच्या कार्यकर्त्यांनी केलाय. दरम्यान काँग्रेस व भाजप कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी इथे गोंधळ घातला, या महिला बोगस मतदान करण्यासाठी प्रतिस्पर्धी उमेदवाराने आणल्याचा आरोप काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलाय. या संदर्भात पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी या सभागृहातील महिलांना बाहेर काढले. या महिला कुठून आल्या आणि खरंच या बोगस मतदान करण्यासाठी आल्या होत्या का? याची चौकशी आता केली जाते आहे. मात्र या सगळ्या प्रकारामुळे इथलं वातावरण तापलं आहे.

**एकूण २०८ महिला आणि मुलं, हे लोक स्थानिक नाहीत**

दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी माहिती देताना सांगितलं कि, अशी तक्रार आल्यानंतर खात्री-पडताळणी सुरू आहे. मोठ्या प्रमाणात जमलेल्या महिला आणि त्यांचं तिथे असण्याचं कारण शोधणे सुरू आहे. मात्र हे लोक स्थानिक नाहीत. एकूण २०८ महिला आणि मुलं यामध्ये आहेत. सगळेच भिवंडीवरून आले असल्याची माहिती आहे. फिरती पथकाकडून तपास सुरू आहे. लवकरच या प्रकरणाची माहिती समोर येईल अशी माहिती अंबरनाथ पोलिसांनी दिली आहे.

### मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी दोन जणांना पकडलं

अंबरनाथ नगरपालिकेसाठी मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर अंबरनाथ शहरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये दोन जणांना पैशाची पॉकिट वाटत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी रंगेहाथ पकडलंय. त्यानंतर या दोन जणांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी भरारी पथकाच्या ताब्यात दिलंय. सध्या घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून पुढील कारवाई सुरु आहे. भाजपच्या उमेदवाराकडून हे पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

## पोलिसांचा सौम्य लाठीमार... ईव्हीएम मशीन आणणाऱ्या कर्मचाऱ्यांकडेच बोगस आयकार्ड

**■अंबरनाथ। प्रतिनिधी,**

राज्यातील २३ नगर परिषद आणि नगरपंचायतीसाठी मतदान सुरू आहे. अंबरनाथ नगरपरिषदेसाठीही मतदान सुरू आहे. मात्र, शहरात अनेक ठिकाणी गडबड गोंधळ झालेला पाहायला मिळत आहे. सकाळीच २०८ हून बोगस मतदार पकडल्याची घटना घडली. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरू केलेली असतानाच ईव्हीएम मशीन आणणाऱ्या कर्मचाऱ्याकडेच बोगस आयकार्ड असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तर काही ठिकाणी मतदान



केंद्रावर गोंधळ झाल्याने पोलिसांना लाठीमार करावा लागला आहे.

अंबरनाथच्या ग्रीन सिटी, प्रभाग क्रमांक २९ मध्ये हा गोंधळ पाहायला मिळाला आहे. ईव्हीएम मशीन आणणाऱ्या कर्मचाऱ्यांकडेच बोगस आयकार्ड आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. या कर्मचाऱ्यांना सर्वच उमेदवारांनी आक्षेप घेतल्याने मतदान केंद्रावर काही काळ गोंधळ झाला. या मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीन बंद पडल्याने दुसरं मशीन मागवण्यात आलं होतं. तेव्हा हा प्रकार उघडकीस आला. जे कर्मचारी मशीन घेऊन आले त्यांच्या आयकार्डवर फोटो आणि नाव तसंच सही, शिक्का देखील नव्हता. त्यामुळे सर्वच उमेदवारांनी निवडणूक अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला. तेव्हा निवडणूक अधिकाऱ्याची चांगलीच बोबडी वळली होती.

### पोलिसांचा लाठीमारं

अंबरनाथ १५ नंबर वॉर्डमध्ये पोलिसांनी लाठीचार्ज केला. भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप करत शिवसैनिकांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. त्यामुळे शिवसेना आणि भाजपचे कार्यकर्ते आमनेसामने आले. वातावरण चांगलंच तापल्याने जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. परिसरात तणावपूर्ण वातावरण पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आलेला आहे.

# भावाच्या नावावर मतदानाचा प्रयत्न फसला
## सिन्नरमधील खळबळजनक घटना बोगस मतदार पोलिसांच्या ताब्यात

**■नाशिक। प्रतिनिधी,**

राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह विविध जिल्ह्यांतील एकूण १४३ सदस्यपदांसाठी शनिवार (२० डिसेंबर) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार असून नाशिक जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकांच्या मतदानादरम्यान सिन्नर शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

सिन्नर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २ मधील मतदान केंद्रावर बोगस मतदार पकडल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. आज सकाळपासून सुरू असलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान



एक मतदार संशयास्पदरीत्या मतदानासाठी आल्याचे लक्षात आल्यानंतर निवडणूक कर्मचाऱ्यांनी तात्काळ चौकशी केली. चौकशीत सदर व्यक्ती बनावट आधार कार्डच्या आधारे आपल्या भावाच्या जागेवर मतदान करण्यासाठी आल्याचे उघड झाले.

मतदान अधिकाऱ्यांनी सतर्कता दाखवत संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले असून त्यानंतर त्याला पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या प्रकारामुळे काही काळासाठी संबंधित मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया थांबवण्यात आली होती. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या घटनेमुळे निवडणूक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले असले तरी, अधिकाऱ्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे संभाव्य गैरप्रकार वेळीच रोखण्यात यश आले आहे. निवडणूक आयोगाकडून या प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागवण्यात येण्याची शक्यता आहे.

### सिन्नरची निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची

सिन्नर नगरपरिषदेची निवडणूक ही राज्यात चचेर्चा विषय ठरत आहे. माजी मंत्री माणिकराव कोकाटे आणि खासदार राजाभाऊ वाजे यांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली आहे. महायुतीकडून नगराध्यक्षपदासाठी तिन्ही पक्षांनी उमेदवार उभे केले असून त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या ठाकरे गटाने उमेदवार दिल्याने लढत अत्यंत चुरशीची झाली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि भाजपला ठाकरेंच्या शिवसेनेकडून कडवे आव्हान उभे राहिले असून, त्यामुळे सिन्नरमधील निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## अकोल्याच्या बाळापूर, यवतमाळमध्ये ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड
# फलटणमध्ये मशीनचे बटनच दबत नसल्यामुळे गोंधळ, मतदारांचा खोळंबा

**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसह अनेक जिल्ह्यांतील एकूण १४३ सदस्यपदांसाठी शनिवारी (२० डिसेंबर) मतदान प्रक्रिया पार पडत आहे. थंडीच्या कडाक्यातही मतदारराजा मतदानासाठी बाहेर पडला असल्याचे चित्र आहे. तर काही मतदान केंद्रावर संथ गतीने मतदारांनी हजेरी लावली आहे. दरम्यान सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. असे असताना राज्यातील काही मतदानकेंद्रावर निवडणूक प्रक्रियेचा पुन्हा बोजवारा उडाल्याचे पाहायला मिळालंय. यात अकोल्याच्या बाळापुरात प्रभाग ५ मधील बूथ क्रमांक एकवर ईव्हीएम मशीन बंद पडलीय. तर तिकडे यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदान सुरू असून एका केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाला आहे. सोबतच फलटण नगरपालिका निवडणूक प्रभाग क्रमांक १३ येथील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीनचे बटन दबत नसल्यामुळे गोंधळ उडाल्याचे बघायला मिळालंय.



### ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड... ऐनवेळी बदलण्यात आली मशीन

अकोल्याच्या बाळापुरात प्रभाग ५ मधील बूथ क्रमांक एकवर एश्ट मशीन बंद पडलीय. जवळपास २० मिनिट मतदान प्रक्रिया ठप्प पडली होती. दरम्यान, ऐनवेळी नगरपालिकेच्या आयोगाच्या अधिकाऱ्यांकडून एश्ट मशीन दुसरी बदलण्यात आली आहे. मशीनच्या सॉकेट तांत्रिक बिघाड झाला होता. त्यानंतर ईव्हीएम मशीन रिप्लेस अर्थातच दुसरी बसवण्यात आली. बाळापूरातील कासारखेड जुनी इमारत दक्षिण भागातील नगरपरिषद प्राथमिक मराठी शाळा मतदान केंद्रावरील हा प्रकार आहे. दरम्यान, बंद पडलेल्या ईव्हीएम मशीनमध्ये १२ जणांचं मतदान झालं होतं.

**यवतमाळमध्ये २० मिनिटांपासून मतदान बंद, मतदारांची मोठी रांग**

असाच काहीसा प्रकार यवतमाळ नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदान सुरू असताना झालाय. यात एका केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाला आहे. प्रभाग क्रमांक २७ मधील ध्रुव प्राथमिक शाळा या मतदान केंद्रावरील खोली क्रमांक पाच मधील ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने २० मिनिटांपासून मतदान बंद आहे. त्यामुळे मतदारांची मोठी रांग या ठिकाणी लागली आहे.

दरम्यान, फलटण नगरपालिका निवडणूक प्रभाग क्रमांक १३ येथील मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीनचे बटन दबत नसल्यामुळे गोंधळ उडालाय. परिणामी, प्रभाग क्रमांक १३ मधील चार नंबरच्या मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया थांबवलीय. या प्रकरणानंतर समशेर सिंह नाईक निंबाळकर स्वतः मतदान केंद्रावर उपस्थित राहून त्यांनी माहिती घेतलीय.

**मतदान केंद्राबाहेर जादूटोणा केल्याच्या प्रकार**

दुसरीकडे, पैठणनंतर आता ऐन मतदानाच्या एक दिवस आधीच फुलंब्री शहरात मतदान केंद्रा बाहेर जादूटोणा केल्याच्या प्रकार समोर आलाय. भारत माता शाळा मतदान केंद्रावर बाहेर हा प्रकार समोर आला आहे. एक काळी बाहुली त्याला पिना टोचलेल्या, लिंबू आणि इतर साहित्य दिसून आलंय. त्यामुळे काही मतदानाच्या आतल्या रात्री सगळ्या प्रकार समोर आल्याने फुलंब्री चर्चा रंगली होती. तर हा सगळा प्रकार कोणी केला याबाबत स्पष्टता मिळू शकली नाहीये.

# महाराष्ट्रात पहिल्यादांच मतदानावेळी घडला अत्यंत भयानक प्रकार!
## १ हजार मतदारांना लग्नाच्या हॉलमध्ये कोंडून ठेवले आणि... नांदेड, अंबरनाथ आणि...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

न्यायालयीन प्रक्रियेमुळे रखडलेल्या महाराष्ट्रातील २३ नगरपालिकांसह ७६ नगरपंचायती १५४ जागांसाठी मतदान घेण्यात आले. महाराष्ट्रात पहिल्यादांच मतदानावेळी अत्यंत भयानक प्रकार घडला आहे. मतदानासाठी आलेल्या १ हजारपेक्षा जास्त मतदारांना लग्नाच्या हॉलमध्ये कोंडून ठेवण्यात आले. मराठवाड्यातील नांदेडसह मुंबईजवळ असलेल्या ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथमध्ये देखील मतदारांना कोंडून ठेवण्यात आले. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली असून या प्रकरणी राष्ट्रवादीने भाजप विरोधात तक्रार दाखल केली आहे. नांदेड जिल्ह्यातील धमार्बाद मध्ये एका मंगल कार्यालयात मतदारांना डांबून ठेवल्याचा गंभीर प्रकार उघड झाला. जवळपास एक हजार लोकांना या ठिकाणी सकाळपासून अकरा वाजेपर्यंत डांबून ठेवण्यात आले होते. भाजपच्या कार्यकर्त्यांनी पैश्यांचे अमिष दाखवून इथे आणून डांबून ठेवल्याचा आरोप मतदारानाही केला. या प्रकरणी राष्ट्रवादीकडून अधिकृत तक्रार



दाखल करण्यात आली आहे.

**अंबरनाथमध्ये शेकडो बोगस मतदार महिलांना मंगल कार्यालयात कोंडले**

अंबरनाथच्या ग्रीन सिटी प्रभाग क्रमांक २९ मध्ये एक अजब प्रकार घडला. या ठिकाणी ईव्हीएम मशीन घेऊन येणाऱ्या कर्मचाऱ्यांकडेच बोगस आयकार्ड सापडले आहेत. या ठिकाणी ईव्हीएम मशीन बंद पडल्यामुळे दुसरे मशीन मागवण्यात आले. मात्र, जे कर्मचारी मशीन घेऊन आले त्यांच्या आयकार्डवर फोटो आणि नाव तसंच सही, शिक्का देखील नव्हता. त्यामुळे सर्वच उमेदवारांनी निवडणूक अधिकाऱ्यांना याचा जाब विचारला. अंबरनाथ मध्ये बोगस मतदार सापडले. १८८ महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. शिवसेना पदाधिकारी आणि ठेकेदार विरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवसेना शिंदे गटाने हे सर्व बोगस मतदार आणल्याचा भाजप आणि काँग्रेसचा आरोप आहे. एका पुर्ढायाच्या मंगल कार्यालयात एकाच ठिकाणी शेकडो महिला आढळल्या आहेत. काँग्रेस आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांनी हा प्रकार उघड केला. अंबरनाथ नगरपालिकेच्या ५९ जागांसाठी आज मतदान पार पडत आहे. काल रात्री दहा वाजता प्रचार याचा कालावधी संपला. मात्र, त्यानंतर रात्री एक ते दीड वाजताच्या सुमारास अंबरनाथ चिंचपाडा कोसगाव परिसरातील एका मंगल कार्यालयात बाहेरून बोगस मतदार आणण्याचा संशय काँग्रेस आणि भाजपच्या कार्यकर्त्यांना आला, त्यानंतर काँग्रेस आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी रात्रीपासूनच या मंगल कार्यालया बाहेर जागता पहायला ठेवला.

**बारामतीत बोगस मतदान**

बारामतीत बोगस मतदानाचा प्रकार समोर आला आहे. एका मतदाराचं मतदान आधी कोणीतरी करून गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.बारामतीतील अहिल्यानगर देवी कल्ब या मतदार केंद्रात हा प्रकार घडला आहे. अमित दिलीप कुलथे मतदान केंद्रात दाखल झाल्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. निवडणूक केंद्रातील कर्मचा-यांनी टेंडर वॉट फॉर्म भरुन घेतल्यानंतर कुलथे यांनी मतदान केले. मात्र, याआधी अमित कुलथे यांच्या नावाने कुणी मतदान केले याबद्दल संशय आहे. याबाबत विचारलं असता निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

## बनावट ई-चलन पाठवून खात्यातून ३.७१ लाख रुपये काढले

**■मुंबई । प्रतिनिधी,**

लोकांना फसवण्यासाठी सायबर गुन्हेगारांनी आता वाहतूक पोलिसांच्या ई-चलन पाठवण्याचा नवा मार्ग अवलंबला आहे. जोगेश्वरी येथे नुकत्याच समोर आलेल्या एका घटनेत, ठगांनी एका नोकरी करणाऱ्या व्यक्तीला कारच्या चलनाचा धाक दाखवून ३ लाख ७१ हजार ८९९ रुपयांची फसवणूक केली आहे. या संदर्भात पीडित व्यक्तीने पोलीस ठाण्यात आणि सायबर हेल्पलाइनवर तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ डिसेंबरच्या दुपारी पीडित व्यक्तीला एका अज्ञात मोबाईल नंबरवरून व्हॉट्सअ‍ॅप मेसेज आला. या मेसेजमध्ये त्यांची कार (एमएच-०३-डीए-३०२६) वर ५,२०० रुपयांचे वाहतूक चलन (ट्रॅफिक चालान) थकित असल्याचे सांगितले होते. यासोबतच 'mparivahan.apk'




नावाची एक फाईल पाठवण्यात आली होती आणि ती सरकारी अ‍ॅप असल्याचे सांगून डाउनलोड करायला लावली.

ठगांच्या जाळ्यात अडकून पीडित व्यक्तीने ती फाईल डाउनलोड केली आणि त्यामध्ये आपली वैयक्तिक व बँक माहिती भरली. माहिती भरताच त्यांच्या मोबाईल स्क्रीनवर ऑनलाइन दंड भरल्याचे कन्फर्मेशन मेसेज दिसला. पीडित व्यक्तीला वाटले की चलानची रक्कम कापली गेली आहे, पण प्रत्यक्षात त्याच वेळी सायबर ठगांनी त्यांच्या मोबाईलचा संपूर्ण अ‍ॅक्सेस मिळवला होता.

फसवणुकीचा खुलासा १६ डिसेंबरच्या रात्री झाला, जेव्हा पीडित व्यक्तीने त्यांच्या बँकेतून आलेल्या मेसेजची तपासणी केली. या तपासणीत समोर आले की, १३ डिसेंबर ते १६ डिसेंबर दरम्यान पीडित आणि त्यांच्या पत्नीच्या वेगवेगळ्या बँक खात्यांमधून हप्त्यांमध्ये एकूण ३,७१,८९९ रुपये काढले गेले होते. ही रक्कम विविध यूपीआय आयडी आणि अ‍ॅक्सिस बँकेच्या एका संशयास्पद खात्यात हस्तांतरित (ट्रान्सफर) करण्यात आली होती.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित व्यक्ती बँकेत पोहोचले, जिथे बँक कर्मचाऱ्यांनी त्यांना सायबर फसवणुकीची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी त्वरित सायबर हेल्पलाइन क्रमांक १९९३ वर संपर्क साधून तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात मोबाईल नंबर, यूपीआय आयडी आणि संबंधित बँक खात्यांच्या आधारावर गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## प आधारित कार-बाइक मोकाट



**राज्यात ॲप आधारित कॅब-बाइक सेवांचा वापर झपाट्याने वाढत असताना, वाढत्या दरांबरोबरच प्रवाशांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्नही ऐरणीवर आला आहे. सोयीच्या नावाखाली सुरू झालेली ही सेवा आता पिळवणूक आणि धोक्याचे कारण ठरत असल्याची भावना बळावत आहे.**

राज्यात ओला, उबर, रॅपिडो या कंपन्या ॲप आधारित प्रवासी वाहतूक सेवा देत आहेत. याला सर्व स्तरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. यातच आता कंपन्यांनी बाइक सेवाही सुरू केली आहे. बाइक सेवेलाही प्रवासी पसंती देऊ लागले आहेत. मुंबई शहरात टॅक्सी, तर उपनगरात रिक्षाचालकांच्या मनमानीपणामुळे त्रस्त झालेले प्रवासी ॲप आधारित सेवांकडे वळले आहेत. त्यामुळे टॅक्सी-रिक्षाचालकही ॲप सेवा देऊ लागले आहेत. प्रत्येक कंपन्यांचे सेवा शुल्क वेगवेगळे असल्याने चालक आपल्या फायद्यानुसार ॲप निवडतात. याचा फटका प्रवाशांना सहन करावा लागत आहे. गर्दीच्या वेळी ॲप सेवांचे दर कित्येक पटीने अधिक असतात. परिवहन विभागाने टॅक्सी-रिक्षासाठी भाडे दर निश्चित केला आहे. मात्र ॲप सेवांचे दर निश्चित नसल्याने कंपन्या प्रवाशांकडून वाटेल ती रक्कम घेत आहेत. यातच गाडी बुक झाल्यानंतर ती किती वेळेत येणार हे दर्शविले जाते. गाडी बुक झाल्यानंतर लोक दहा-पंधरा मिनिटे गाडीची प्रतीक्षा करतात. मात्र ऐनवेळी गाडी रद्द होते. त्यानंतर पुन्हा गाडी बुक होण्यास आणि येण्यास विलंब होतो. बहुतांश वेळी तर ॲपवर बुक झालेल्या गाडीचा क्रमांक आणि प्रत्यक्षात वेगळ्याच क्रमांकाची गाडी येते. यामुळे महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बुक झालेली गाडी प्रवाशाने रद्द केल्यास प्रवाशाला दंड केला जातो. मात्र प्रवाशाने बुक केलेली सेवा कंपनीकडून रद्द झाल्यानंतर प्रवाशाला कोणताही लाभ दिला जात नाही. ॲपवर तक्रारी करण्यासाठी विविध पर्याय असतात. प्रवाशांनी तक्रार केल्यानंतर त्याची दखल घेण्यात येत नाही. त्यातच अस्वच्छता, वातानुकूलित यंत्रणा बंद ठेवणारे चालकही अनेक असतात. याबाबत तक्रारी केल्यानंतरही कंपन्या दाद देत नाहीत. राज्य सरकारने ॲप आधारित वाहनांना तात्पुरता परवाना दिला आहे. मात्र या सेवांची भाडे निश्चिती, प्रवाशांची सुरक्षा यावर परिवहन विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने या कंपन्या मोकाट सुटल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी राज्य मंत्रिमंडळाने राज्यातील एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये बाइक-टॅक्सी सेवा सुरू करण्याबाबतचे धोरण लागू केले. या धोरणामुळे राज्यातील नागरिकांसाठी वाहतुकीचे किफायतशीर आणि सोयीचे पर्याय उपलब्ध होतील, असा दावा सरकारने केला होता. या धोरणानुसार बाइक-टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांना इलेक्ट्रिक बाइक वापराव्या लागणार आहेत. त्या पिवळ्या रंगात रंगवलेल्या, वाहनांना जीपीएस लावणे, संकटकालीन संपर्क सुविधा, वेग पडताळणी, चालक व प्रवासी या दोन्हींकरिता विमा संरक्षण, स्वच्छता दर्जा राखणे आदी बाबी आवश्यक करण्यात आल्या आहेत. त्यासोबतच दुचाकी चालकांची निवड करताना त्यांची पार्श्वभूमी तपासून सुरक्षेबाबतच्या सर्व निकषांची पूर्तता करणे आवश्यक करण्यात आले आहे. हे धोरण लागू झाल्यानंतर काही आरटीओंनी नियम धाब्यावर बसविणाऱ्या बाइकचालकांवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. मात्र ज्या कंपन्या नियम धाब्यावर बसवून या सेवा पुरवत आहेत त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. कंपन्यांवर सरकारचा अंकुश नसल्याने कंपन्या सरकारच्या नाकावर टिच्चून 'हम करे सो कायदा' याप्रमाणे कार्यरत आहेत. ॲप आधारित प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर परिवहन विभागाचा वचक नसल्याने यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नुकताच मुलुंड येथे रॅपिडो बाइक अपघातात एका महिलेला प्राण गमवावा लागला. हे प्रकरण ताजे असतानाच कल्याण येथे रॅपिडो बाइकचालकांकडून एका प्रवासी तरुणीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर कायदा धाब्यावर बसवून अवैधरीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या रॅपिडो, ओला, उबेर यांसारख्या कंपन्यांना दिलेला तात्पुरता परवाना रद्द करण्याबाबत परिवहन मंत्र्यांनी मोटार परिवहन विभागाची तातडीची बैठक मंगळवारी (दि. १६) बोलावली होती. मात्र ऐनवेळी ही बैठक रद्द करून आता ती बुधवारी (दि. १७) बोलावली आहे. या बैठकीत तरी प्रवाशांच्या सुरक्षेची गंभीर दखल घेतली जाणार, की कंपन्यांना पुन्हा मोकळे रान दिले जाणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे. सरकारचे जाहीर केलेले नियम कंपन्या बिनदिक्कतपणे धाब्यावर बसवत असतील तर त्यांच्यावर तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे अन्यथा ॲप आधारित प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्या प्रवाशांच्या गरजेचा फायदा उठवत आर्थिक लूट सुरूच ठेवणार आहेत. परिवहन विभागाने बाइक- टॅक्सीचा किमान भाडेदर १५ रुपये निश्चित केला असतानाही कंपन्या २५ रुपयांहून अधिक किमान भाडेदर आकारत आहेत. परिवहन विभागाचा अंकुश नसल्याने कंपन्यांकडून राजरोसपणे प्रवाशांची लूट सुरू आहे. परिवहन विभागाचे आदेश कंपन्या झुगारून लावत असतील तर त्यांच्यावर वेळीच कारवाई होणे गरजेचे आहे.

# अर्थव्यवस्थेचा कोंडला श्वास



अलीकडील काळात रुपयावरील वाढत्या दबावामागे अनेक कारणे आहेत, ज्यात डॉलरची मजबुती, जागतिक अनिश्चितता वाढणे आणि मजबूत परदेशी मागणी यांचा समावेश आहे. यापूर्वी अशी लक्षणीय घसरण २०२२ मध्ये दिसून आली होती. गेल्या काही दिवसांपासून बाजारातील अनिश्चितता वाढत आहे. डॉलर मजबूत होत आहे. परिणामी, गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक पर्याय शोधत असून डॉलरकडे वळत आहेत. याव्यतिरिक्त परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारपेठेतून पैसे काढण्याचा वेग वाढवला आहे. परिणामी, रुपया कमकुवत होत असून डॉलरची मागणी वाढत आहे. रुपया ९० च्या पुढे जाणे हे देखील बाजारातील बदल दर्शवते. अमेरिकन धोरणांचाही रुपयावर परिणाम होत आहे. अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर लादला आहे. शिवाय, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारात होणारा विलंब, अमेरिकेची आर्थिक धोरणे आणि अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'च्या व्याजदराबद्दल वाढत्या अटकळींमुळे रुपयावर दबाव वाढत आहे. रुपयाच्या कमकुवतपणामुळे केवळ आयात किमती वाढत नाहीत, तर पेट्रोल आणि डिझेल, यंत्रसामग्री, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक्स आणि अगदी परदेशी प्रवासाच्या किमतीही वाढतात. रुपया ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला असताना दबाव कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक डॉलर्सची विक्री करू शकते. तथापि, रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपाचा मर्यादित परिणाम होईल, कारण सध्या रुपयावर मोठा दबाव आहे. बाजार अजूनही रिझर्व्ह बँकेच्या पुढील पावलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अमेरिकेसोबतच्या एका मोठ्या व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यास झालेल्या विलंबामुळे भारतीय रुपयात मोठी घसरण झाली आहे.

'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार गेल्या काही आठवड्यांमध्ये रुपया वाचवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने फारसा हस्तक्षेप केलेला नाही आणि परदेशी गुंतवणूकदार शेअर बाजारातून पैसे काढत आहेत. या दोन्ही घटकांमुळे रुपयावरही दबाव येत आहे. आयात महाग होत असल्याने सामान्य माणसाच्या खिशावर महागाईचा भार आणखी वाढू शकतो. मोठ्या कंपन्या, आयातदार आणि परदेशी गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात डॉलर खरेदी करत आहेत. म्हणूनच रुपया सतत कमकुवत होत आहे. या व्यतिरिक्त, कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडत आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांचा मूड आणखी बिघडत आहे. याचा अर्थ डॉलरची मागणी खूप जास्त आहे आणि पुरवठा कमी आहे. परिणामी, सतत घसरण होत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची भीतीदेखील आहे. त्याचा थेट परिणाम आपल्या खिशावर होईल. एरव्ही बाजारात डॉलर्स विकून रिझर्व्ह बँक रुपयाला घसरण्यापासून वाचवत असते; परंतु या वेळी रुपया थोडा मजबूत झाला, तेव्हा रिझर्व्ह बँकने स्वतः डॉलर्स खरेदी केले. भारताची अर्थव्यवस्था खूप मजबूत आहे. जीडीपीची वाढ ८.२ टक्के आहे. तथापि, डॉलरची मागणी वाढल्यामुळे, हे सकारात्मक पैलू झाकोळले गेले असून रुपया कमकुवत दिसत आहे. याचा अर्थ, प्रत्यक्षात परिस्थिती चांगली आहे; परंतु डॉलर्सची भूक जास्त आहे. चलनातील घसरणीचे कारण परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारां (एफपीआय) कडून दररोज होणारी विक्री हे आहे. गेल्या आठ महिन्यांपासून रुपया घसरत आहे आणि आता तो एका नवीन नीचांकावर पोहोचला आहे. बराच काळ स्थिर असलेल्या रुपयाने गेल्या वर्षीच ८५-९० चा टप्पा ओलांडला आहे.

अलीकडे डॉलरच्या तुलनेत रुपया २५ पैशांनी घसरून ९०.२१ च्या नवीन नीचांकावर बंद झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी एक डॉलर एका रुपयाच्या बरोबरीचा होता असे अनेकदा ऐकायला मिळते. ही कल्पना चांगली वाटते; परंतु आर्थिक तथ्ये आणि ऐतिहासिक नोंदी वेगळेच सांगतात. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीचा विचार केल्यास भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी एक रुपया एक डॉलरच्या बरोबरीचा होता, हा दावा खरा नाही. केंद्रीय बँकेच्या ह्यआरबीआय, द १९९१ प्रोजेक्ट डेटाह्ण या दस्तावेजानुसार स्वातंत्र्याच्या वेळी, भारतीय रुपया अमेरिकन डॉलरशी नव्हे, तर ब्रिटिश पौंड स्टर्लिंगशी जोडलेला होता. रुपयाचा विनिमय दर पौंड या चलनाद्वारे निश्चित केला जात असे. त्या वेळी एक पौंड १३.३३ रुपयांच्या बरोबरीचा होता. त्या वेळी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ब्रिटिश पौंडचे मूल्य ४.०३ डॉलर होते. १९६६ मध्ये भारतीय चलनाची पहिली मोठी घसरण झाली. या काळात डॉलरच्या तुलनेत रुपया ४.७६ वरून ७.५० वर आला. हे त्या काळातील अशांत काळामुळे झाले. चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५) सोबतच्या युद्धांमुळे देश समस्यांशी झुंजत होता. या युद्धांमुळे अर्थव्यवस्था बिघडली. १९६५-६६ मध्ये देशात तीव्र दुष्काळ पडून अन्नधान्य उत्पादनात घट झाली आणि महागाई गगनाला भिडली. या कठीण काळात भारताला परकीय मदतीची नितांत आवश्यकता होती. जागतिक बँक आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी निर्यात वाढवण्यासाठी भारताने आपल्या चलनाचे अवमूल्यन करावे असा आदेश दिला. त्यानंतर डॉलरच्या तुलनेत रुपया ७.५० वर घसरला.

१९९१ हे वर्ष रुपयाच्या घसरणीच्या दृष्टीने देशासाठी महत्त्वाचे ठरले. आर्थिक आव्हानांना तोंड देत देशाने आर्थिक उदारीकरणाला सुरुवात केली. या वेळी रुपया २१ वरून २६ च्या आसपास घसरला. हा भारताच्या आर्थिक इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा होता. देयकांच्या संतुलनाच्या संकटामुळे भारताकडे आयात (तेल, आवश्यक वस्तू) खरेदी करण्यासाठी फक्त तीन आठवड्यांचा परकीय चलन साठा होता. दुसरीकडे, आखाती युद्ध किंवा इराक-कुवेत युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या. त्यामुळे भारताचे आयात बिल लक्षणीयरीत्या वाढले. यामुळे रुपया आणखी कमकुवत झाला. राजकीय अस्थिरतेने देशाला वेढले आणि गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होत गेला. या संकटावर मात करण्यासाठी तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग आणि पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी अर्थव्यवस्था उदार करण्याचा आणि निर्यात स्वस्त करण्यासाठी आणि परकीय चलन आणण्यासाठी दोन टप्प्यात रुपयाचे अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. १९९१ नंतर देशात आघाडी सरकारांचा काळ आला. १९९१ ते २००८ दरम्यान रुपया ३९ रुपयांपर्यंत कमकुवत झाला. २००८ च्या मंदीनंतर रुपया घसरून डॉलरच्या तुलनेत ५१ रुपये झाला. तथापि, ही घसरण जागतिक घटकांमुळे होती. अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स बँकेच्या पतनामुळे जागतिक मंदी आली. जोखीम टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांनी भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसे काढून घेण्यास सुरुवात केली. डॉलरची मागणी वाढल्याने रुपया आणखी कमकुवत झाला. रुपयात शेवटची मोठी घसरण २०१३ मध्ये झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर येण्यापूर्वी डॉलरच्या तुलनेत रुपया ५५ वरून ६८.८० वर आला. या वर्षी, अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'ने त्याचा प्रवाह कमी करण्याची घोषणा केली. या भीतीने गुंतवणूकदारांनी भारतातून लक्षणीय रक्कम काढून घेतली. या काळात 'मॉर्गन स्टॅनली'ने उच्च चालू खात्यातील तूट (कॅड) आणि महागाईमुळे भारताला 'नाजूक पाच' अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट केले. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून, डॉलरच्या तुलनेत रुपया ८४-८५ वर व्यवहार करत होता. २०२५ मध्ये डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले आणि प्रत्युत्तरात्मक शुल्काचा खेळ सुरू झाला. अमेरिकेने जगभरातील देशांना शुल्काची धमकी देऊन व्यापार करार करण्यासाठी दबाव आणला. काही देशांनी माघार घेतली आणि शुल्क कमी केले किंवा काढून टाकले गेले. भारताने मात्र आपल्या व्यापार हितसंबंधांशी तडजोड करण्यास नकार दिला. त्यामुळे ट्रम्प प्रशासन नाराज झाले. ऑगस्टमध्ये अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क जाहीर केले. याचा अमेरिकेला होणाऱ्या भारतीय उत्पादनांच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला. परदेशी गुंतवणूकदारांनीही मोठ्या प्रमाणात विक्री केली. त्यामुळे रुपया कमकुवत झाला. अलीकडच्या काळात रुपयाच्या घसरणीने देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात मदत केली आहे, असा सरकारचा विश्वास असला तरी काही तज्ज्ञांचा विश्वास आहे, की रुपयाची घसरण नेहमीच कमकुवतपणाचे लक्षण नसते. १९९१ पासून बाजार रुपयाचे मूल्य ठरवतो. कधी कधी, रुपयाचे घसरण निर्यातदारांसाठी (जसे की आयटी कंपन्या आणि औषध कंपन्या) फायदेशीर असते, कारण ते डॉलरमध्ये कमावतात आणि रुपयात रूपांतरित केल्यावर जास्त पैसे मिळवतात. रुपया स्थिर करण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँकेने अमेरिकेसोबत व्यापार करार करण्याव्यतिरिक्त इतर मार्गांनी रुपया स्थिर करण्यासाठी एक मजबूत धोरण विकसित केले पाहिजे. देशाच्या निर्यातभिमूख सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार रोखणेदेखील रुपया स्थिर करण्यास मदत करू शकते.

# यंदा संक्रांत कोणावर?

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने अपेक्षेप्रमाणे सोमवारी जाहीर केल्याने राज्यात 'महापालिकांचा महासंग्राम' सुरू झाला आहे. त्यात आता मकर संक्रांतीपर्यंत खंड पडणार नाही. या वर्षाची संक्रांत कोणावर आणि तीळगूळ कोणाला, ते संक्रांतीनंतर दोन दिवसांनी ईव्हीएम मशीनमधूनच उघड होईल. महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन नॉनस्टॉप सात दिवस चालवण्याचं सरकारने कामकाज सल्लागार समितीत संमत करून घेतलं, तेव्हाच १४ डिसेंबरनंतर कोणत्याही क्षणी महापालिकांच्या निवडणुका जाहीर होणार, हे स्पष्ट झालं होतं .अन्यथा, नागपूरच्या मनमौजी थंडीत कोण कशाला रविवारीही कामकाज ठेवेल? सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २६ जानेवारीपूर्वी आटोपण्याचे आदेश दिले आहेत. नगर परिषदा आणि नगरपंचायतींचं मतदान झालं असलं, तरी अद्याप मतमोजणी आणि निकाल जाहीर होणं शिल्लक आहे. त्याबाबतही न्यायालयाने आदेश दिले आहेत. पण, त्या आदेशांबाबतच प्रशासकीय यंत्रणेच्या मनात गोंधळ आहे. त्या गोंधळाचं निराकरण झालं, की ते निकाल लागतीलच. पण, तोपर्यंत सगळ्यांचं लक्ष महानगरपालिकांच्या निवडणुकांकडे लागलं असेल. सर्वच राजकीय पक्षांसाठी शक्तिप्रदर्शनाची ही उत्तम संधी आहे. विद्युतवेगाने नागरिकरण सुरू असलेल्या महाराष्ट्रातल्या महानगरी मतदाराच्या मनात आपलं स्थान नेमकं काय आहे, हे साऱ्या देशाला दाखवून देण्याची संधी महाराष्ट्रातल्या विविध पक्षांच्या नेत्यांना यानिमित्ताने मिळाली आहे. त्यासाठी त्यांनी व्यूहरचना कधीचीच करून ठेवली आहे. आता साधनसामग्रीसह मैदानात उतरणं तेवढं बाकी आहे. नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत जो राजकीय गोंधळ दिसला, तसाच गोंधळ या निवडणुकांतही बघायला मिळणार आहे. महाविकास आघाडी राज्यातून संपल्यात जमा आहे. आघाडीला धरून ठेवणारी शरद पवार नावाची शक्तीच आघाडीतून बाहेर पडली आहे. त्यांनी महाविकास आघाडीतील आपल्या तुटल्या तुकड्यासोबत निवडणुकीत युती करण्याचं नक्की केलं आहे. भारतीय जनता पक्षाचे सर्वोच्च चाणक्य अमित शहा यांनीही या जुळवाजुळवीला कालच दिल्लीत संमती दिली आहे. शरद पवार आणि अजित पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन तुकड्यांत अजित पवार यांचा तुकडा सध्या चांगलाच ताकदवान आहे. अजितदादा स्वतः उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना दिल्लीत अजून मंत्रीपद मिळालं नसलं, तरी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना तेल आणि नैसर्गिक वायूशी संबंधित तालेवार समितीचं अध्यक्षपद मिळालं आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांचा दिल्लीच्या वर्तुळातला वावर सहजपणे होतो आहे. त्यामुळे या दोन पक्षांत जुळवून घेण्याची गरज सर्वाधिक शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला वाटायला हवी. पण, दिसतं आहे ते वेगळंच. दुसऱ्या गटाबरोबर जुळवून घेण्याबाबत अजित पवार गटच जास्त उत्सुक दिसतो आहे. कारण, दोन तुकड्यांत हा गट ताकदवान असला, तरी महायुतीत प्रतिष्ठेने राहायचं, तर या निवडणुकीत जे बळ दाखवावं लागणार आहे, ते शरद पवार यांच्या तुकड्याच्या सहकार्याशिवाय शक्य नाही, हे त्यांना समजून चुकलं आहे. तटकरे आणि पटेल यांनी म्हणूनच शहा यांची भेट घेऊन त्यांच्याकडून या सहकार्याला संमती मिळवली. शरद पवार गटाचे कार्यकर्ते राज्यात सध्या निर्नायकी अवस्थेत आहेत. खुद्द पवार यांना वय आणि आजारपण यामुळे अन्य नेत्यांच्या तडफेने राजकारण करणं केवळ अशक्य आहे. त्यांच्याशिवाय त्या पक्षात पक्षावर प्रभाव पाडेल, पक्षसंघटनेला एकत्र बांधून ठेऊ शकेल, असा दुसरा नेता नाही. हे खुद्द शरद पवार यांना सर्वात आधी लक्षात आलं असेल. त्यामुळे, पक्ष अगदीच 'शून्या'त जाण्यापेक्षा आपल्याच पुतण्याशी समझोता करून (स्वतःला वेगळं ठेऊन) पक्ष महायुतीच्या वाहत्या प्रवाहात सोडून देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला दिसतो. शरद पवार आणि शहा यांच्यातल्या एकेरी सामन्यात हा अंतिमतः शहा यांचाच विजय असल्याने तटकरे आणि पटेल यांना परवानगी मिळवणं अगदीच सोपं गेलं असणार. शेवटी, 'करून दाखवलंच' म्हणून त्यांनी शहा यांची शाबासकीही मिळवली असेल! पण, तरीही यात एक अडचण आहेच. नवाब मलिक. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोणत्याही परिस्थितीत नवाब मलिक यांचा चेहरा महायुतीत दिसायला नको आहे. भाजपला मुस्लीमबहुल मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला लढवायचं आहे. त्यामुळे, राष्ट्रवादीला त्यांना पूर्ण सोडायचंही नाही आहे. सना मलिक या राष्ट्रवादीच्या आमदार आहेत. त्यामुळे, राष्ट्रवादी मुंबईत महायुतीशी अप्रत्यक्ष समन्वयाने पन्नासेक जागा लढेल. असाच पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आणखी काही ठिकाणचा अपवाद करत राष्ट्रवादी महायुतीत असेल. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसह! उबाठाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी युती नक्की केलीच आहे. पण, मुंबईच्या काँग्रेसला मनसे नको आहे. उबाठा आणि मनसे यांनी परस्परात जागा वाटपासह सर्वच गोष्टी नक्की केल्या आहेत. त्याची प्रचारनीती, घोषणा सगळंच ठरलं आहे. काँग्रेसशिवाय. त्यामुळे, महायुतीतल्या उरल्यासुरल्या काँग्रेसवर आपोआपच 'एकला चलो'ची वेळ आली आहे. त्यांचे जे नेते या भाषेत इतरांना इशारे देत होते, त्यांना आता मोठी संधी आहे. काँग्रेसमध्ये किती जण या स्थितीत संतुष्ट असतील आणि 'दिल्ली'ची पक्षाच्या या स्थितीबद्दल काय प्रतिक्रिया असेल, ते तेच जाणोत. थोडक्यात काय, मैदानात पाऊल टाकण्याआधीच महायुती आणखी बळकट झाली आहे. त्यांच्यासमोर संपूर्ण महाराष्ट्रात एकच एक असा प्रतिस्पर्धीच कुठे नसणार, हे आताच स्पष्ट झालं आहे!

# भाषा युती-आघाडीची, तयारी स्वबळाची




**निवडणूक आयोगाकडून नाशिकसह महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. नाशिक महापालिकेबाबत राजकीय पक्षांची भाषा आज जरी महायुती आणि महाविकास आघाडी होईल अशी असली, तरी कामकाज मात्र स्वबळाचे सुरू आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीऐवजी प्रत्येक पक्ष स्वबळावर निवडणूक लढेल, अशी जोरदार शक्यता पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून वर्तवली जात आहे.**

गेल्या साडेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुकांना मोठी प्रतीक्षा होती. प्रारंभी अनेक इच्छुकांनी प्रभागात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले. काहींनी निवडणुका लांबल्याने उपक्रमांपासून दोन हात दूर राहणे पसंत केले. काही विद्यमान नगरसेवकांनीदेखील प्रभागात आपला जनसंपर्क कायम ठेवला आहे. अखेर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात ३१ जानेवारीपर्यंत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, असा निर्णय आल्यानंतर इच्छुकांना मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगानेदेखील पहिल्या टप्प्यात नगर परिषदा, नगर पंचायत निवडणुका घेतल्या. दुसऱ्या टप्प्यात राज्यातील जिल्हा परिषद निवडणुका घेण्याचे नियोजन होते; परंतु ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुढे आल्यामुळे या निवडणुका न्यायालयाच्या कचाट्यात सापडल्या आहेत. त्याऐवजी आयोगाने राज्यातील मुदत संपलेल्या महापालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार राज्यातील सर्व महापालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान, तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. प्रचारासाठी आणि उमेदवारी निवडीसाठी अत्यंत कमी कालावधी असल्याने सर्वच पक्षांची जोरदार तयारी सुरू आहे.

आज जरी महाविकास आघाडी आणि महायुती होईल असे नेतेमंडळी बोलत असली, तरी काही पक्षांनी महापालिकेच्या सर्वच १२२ जागांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्यामुळे ऐनवेळी पक्ष किंवा स्थानिक पातळीवर जो निर्णय होईल, त्यानुसार महाविकास आघाडी, महायुतीतून अथवा स्वबळावर उमेदवारी देण्यात येणार आहे. महायुती, महाविकास आघाडी किंवा स्वबळासाठी प्रत्येक पक्षाकडून तयारी सुरू आहे. महायुतीतील भारतीय जनता पक्षाने इच्छुकांच्या मुलाखती घेण्यासाठी आघाडी घेतली आहे. चार-पाच दिवसांत सर्वच १२२ जागांसाठी मुलाखती घेण्यात आल्या आहेत. हजारांहून अधिक इच्छुकांनी मुलाखती दिल्या आहेत. त्यामुळे भारतीय जनता पक्षाकडे सर्वाधिक इच्छुक आहेत. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेदेखील मुलाखतींना प्रारंभ केला आहे. राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (एकनाथ शिंदे), शिवसेना (उबाठा) आणि काँग्रेस यांनी अद्याप इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या नसल्या, तरी बैठकांचा धडाका लावला आहे. काँग्रेसने काही दिवसांपूर्वी इच्छुकांचे अर्ज मागवले आहेत. शिंदे सेनेनेदेखील महायुतीत स्थान द्यायचे असेल, तर नाशिक महापालिका निवडणुकीत किमान ४० जागा मिळाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्ष ४० जागा शिवसेनेला देईल, अशी शक्यता सध्या तरी दिसून येत नाही. परिणामी महायुती होण्याची शक्यता धूसर झाली आहे. नाशिक महापालिका निवडणुकीत शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (शिंदे सेना) आणि राष्ट्रवादी (अजित पवार), तसेच शिवसेना (उबाठा), मनसे, काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष असे पाच पक्ष एकत्र येतील,अशी जोरदार चर्चा आहे. काही नेत्यांच्या बैठका देखील झाल्या आहेत. मात्र काय निर्णय होईल, यासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

आचारसंहिता लागण्याच्या काही तास अगोदर कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन नाशिकमध्ये दाखल झाले. सकाळपासूनच तीन-चार ठिकाणी साधू-संत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य वृक्षारोपण करण्यात आले. रामकालपथ आणि विविध विकासकामांचे भूमिपूजन करत, एक प्रकारे आचारसंहितेच्या काही तास अगोदर जोरदार शंखनाद फुंकण्यात आला. वृक्षप्रेमींची नाराजी दूर करण्याचा प्रयत्नदेखील या वृक्षारोपण कार्यक्रमातून दिसून येतो. पंधरा हजारांपैकी २ हजार झाडे लावण्यात आली आहे. टप्प्याटप्प्याने १५ हजार, किंबहुना ५० हजारांपर्यंत झाडे लावण्याचा संकल्प भारतीय जनता पक्षाने जाहीर कार्यक्रमात व्यक्त केला आहे. त्यामुळे आगामी काळात नाशिक आणखी हरित होईल, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करू या. बरोबर एक महिन्यानंतर महापालिका लोकनियुक्त सत्ताधाऱ्यांच्या हाती जातील. मात्र तत्पूर्वी नाशिक महापालिकेची सत्ता ताब्यात घेण्यासाठी मोठा रणसंग्राम पाहायला मिळणार आहे. दीड वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा होत असल्याने, त्यानिमित्ताने सुमारे २५ हजार कोटींची कामे केली जाणार आहेत. त्यामुळे इच्छुकांच्या गर्दीत आणखी भर पडली आहे.




**स्ट्रॉबेरी** : आंबट गोड स्ट्रॉबेरीची चव सगळ्यांनाच खूप आवडते. यामध्ये अनेक पोषक तत्वे देखील असतात ज्याचा शरीराला फायदाच नाही तर केसांना मजबूत बनवण्यासाठी उपयोग होतो. यात मॅग्नेशियम मॅगनीज, कॉपर मुबलक प्रमाणात असते. ते केसांच्या कूपांना उत्तेजित करतात, ज्यामुळे केसांची वाढ होण्यास मदत होते. यासाठी स्ट्रॉबेरीचा हेअर मास्क बनवा. ४ ते ५ स्ट्रॉबेरी मिक्स करा. त्यात एक चमचा दही मिक्स करा आणि केसांना लावा. अर्ध्या तासानंतर केस लाईट शॅम्पूने धुवा. यामुळे तुमचे केस मजबूत होतील.

**किवी** : किवीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. याशिवाय त्यात बीटा-कॅरोटीन हे अँटीऑक्सिडंट असते. जे केस मजबूत करण्यासाठी खूप फायदेशीर आहे. तुम्ही किवी हेअर मास्क लावू शकता. यासाठी दोन चमचे किवी पल्प घ्या. त्यात एक चमचा खोबरेल तेल घालून चांगले मिक्स करा आणि हेअर मास्क टाळूपासून केसांच्या टोकापर्यंत लावा.

**सफरचंद** : सफरचंदात असलेले अँटीऑक्सिडंट केसांसाठी खूप फायदेशीर असतात. हे केस गळण्यापासून थांबवतात आणि केसांच्या कूपांना मजबूत करतात. सफरचंदाच्या मास्कसाठी तुम्ही सफरचंद सोलून त्याचे छोटे तुकडे करा. त्यात एक अंड घाला. त्यात एक चमचा ऑलिव्ह ऑईल घालून चांगले मिक्स करा. हा हेअर मास्क तुमच्या टाळूवर आणि केसांना लावा. अर्ध्या तासानंतर केस शॅम्पूने धुवा.

**पपई** : पपईमध्ये देखील असे अनेक पोषक तत्व असतात जे केस मजबूत करण्यास मदत करतात. पपईचा हेअर मास्क बनवण्यासाठी दोन चमचे पपईचा पल्प काढा. त्यात एक चमचा मध मिक्स करा आणि घट्ट पेस्ट तयार करा. हा हेअर मास्क तुमच्या टाळूवर आणि केसांवर लावा आणि अर्धा तास लावून ठेवा. आता केस शॅम्पूने धुवा. यामुळे तुमचे केस मऊ होतील.

**केळी** : केळ्यापासून बनवलेला हेअर मास्कही तुमचे केस मजबूत आणि घट्ट करू शकतात. केळ्यामध्ये व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम, अँटीऑक्सिडंट्स असतात. याशिवाय त्यात सिलिका देखील असते. जे केस मजबूत आणि घट्ट होण्यास मदत करतात. एक केळं छान मिक्स करा. त्यात एक चमचा ऑलिव्ह ऑईल आणि एक चमचा मध घालून चांगले मिक्स करा. हे मिश्रण केसांवर लावा. अर्ध्या तासानंतर केस शॅम्पूने धुवा.

## निरोगी हृदयासाठी तुमच्या आहारात समावेश करा



**हिरव्या पालेभाज्या** : हिरव्या पालेभाज्या हा पोषक तत्वांचा खजिना आहे. तुमच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करून तुम्ही शरीरातील अनेक आजार कमी करू शकता. यासाठी पालक भाजीचा तुम्ही तुमच्या आहारात समावेश करू शकता. ही भाजी खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य चांगले राहते. या भाज्यांमध्ये अँटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम यांसारख्या अनेक पोषक घटकांचा समावेश असतो. याशिवाय हिरव्या पालेभाज्यांमुळे पचनसंस्थाही निरोगी राहते.

**डार्क चॉकलेट** : खरंतर चॉकलेट खायला प्रत्येकाला आवडते. पण, पण डार्क चॉकलेट खाल्ल्याने हृदयाशी संबंधित समस्या कमी होतात. त्यात फ्लेव्होनॉईड्ससारखे अँटिऑक्सिडंट असतात, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. हे खाल्ल्याने तुमचा मूडही चांगला राहतो. पण, डार्क चॉकलेट कमी प्रमाणात खाणं देखील गरजेचं आहे.

**अक्रोड** : अक्रोड हे सुपरफूड म्हणून ओळखले जाते. हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामुळे तुमचे हृदयही निरोगी राहते. यामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड, फायबर आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, ज्यामुळे हृदय निरोगी राहते.

**ब्लॅकबेरी** : ब्लॅकबेरीमध्ये भरपूर अँटीऑक्सिडेंट असतात, जे हृदय निरोगी ठेवतात. तुम्ही तुमच्या आहारात स्ट्रॉबेरी आणि ब्लूबेरीचा समावेश करू शकता. यामध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म आढळतात. जे हृदयाच्या आरोग्यास प्रोत्साहन देतात. ब्लॅकबेरी खाल्ल्याने हृदयविकाराचा धोकाही कमी होतो. त्यात असलेले अँथोसायनिन्स सारखे अँटिऑक्सिडंट ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ कमी करण्यास मदत करतात.

**फिश ऑईल** : ओमेगा-३ फॅटी ॲसडस समृध्द फिश ऑईल तुमचे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. जर तुम्ही नियमितपणे तुमच्या आहारात फिश ऑईलचा मर्यादित प्रमाणात समावेश केला तर ते हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्यास मदत करू शकते.

**हृदयासाठी हानिकारक पदार्थ**

- एनर्जी ड्रिंक्स
- तळलेले पदार्थ
- पिज्झा
- चायनीज पदार्थ

## भोपळा आवडत नसेल तर फक्त भोपळ्याच्या बिया खा



भोपळा ही अतिशय पौष्टिक भाजी आहे, जी खाल्ल्याने आरोग्यासाठी अनेक फायदे होतात. पण अनेकदा भोपळ्याचे नाव ऐकताच लोकांचे नाक-तोंड मुरडायला लागतात. यामुळे तुम्ही अनेक पोषक तत्वांपासून वंचित राहू शकता. अशा परिस्थितीत भोपळ्याच्या बिया खाल्ल्यानेही फायदा होऊ शकतो. चला जाणून घेऊयात भोपळ्याच्या बियांचे फायदे.

**हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते** : भोपळ्याच्या बिया हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानल्या जातात. कारण त्यात फायबर आणि अँटीऑक्सिडंट असतात. तर मोनोसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड त्यांच्या बियांमध्ये आढळतात. जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते. यामध्ये मॅग्नेशियम देखील आढळते, जे हृदय सक्रिय ठेवण्यास मदत करते.

**हाडे मजबूत करण्यासाठी उपयुक्त** : भोपळ्याच्या बियांमध्ये कॅल्शियम आढळते, ज्यामुळे हाडे निरोगी राहण्यास मदत होते. तसेच हाडांशी संबंधित आजार होण्यापासून रोखतात. यामध्ये फॉस्फरस आणि झिंक देखील आढळतात, त्यामुळे ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजाराशी लढण्यासाठी हे फायदेशीर मानले जाते.

**वजन कमी करते** : भोपळ्याच्या बिया चयापचय वाढवतात.त्या हळूहळू पचतात. त्यामुळे पोट जास्त काळ भरलेले राहते आणि वजन कमी होण्यास मदत होते. तसेच यामध्ये कॅलरी कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे तुम्ही हे खाल्ल्याने वजनही कमी होऊ शकते. .

**तणाव दूर करण्यास मदत** : जर तुम्ही तणावाचा सामना करत असाल तर भोपळ्याच्या बियांचा आहारात समावेश करावा. कारण त्यामध्ये ट्रायप्टोफॅन अमिनो ॲसिड आढळते जे तणाव कमी करण्यास मदत करते.

**बीपी नियंत्रित करते** : भोपळ्याच्या बियांमध्ये अनेक खनिजे आढळतात. जसे मॅगनीज, तांबे, जस्त आणि फॉस्फरस जे रक्तदाब नियंत्रणात ठेवतात. भोपळ्याच्या बियांमध्ये असलेले खनिजे रक्तातील मीठाचे प्रमाण सामान्य ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो.

**मधुमेहासाठी फायदेशीर** : भोपळ्याच्या बिया मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर ठरतात. भोपळ्याच्या बिया इन्सुलिनचे प्रमाण संतुलित ठेवण्यास मदत करतात. त्यात फायबर असल्यामुळे ते पचनक्रिया मंदावते. त्यामुळे रक्तातील साखरेचे कण कमी होतात. स्वादुपिंडाला योग्य प्रमाणात इन्सुलिन तयार करण्यासाठी वेळ मिळतो.

**केसांसाठी फायदेशीर** : भोपळ्याच्या बिया खाल्ल्याने केसांना खूप फायदा होतो. यातील जीवनसत्त्वे आणि खनिजे केसांची वाढ वाढवण्यास मदत करतात. यामुळे केस तुटण्याची प्रक्रियाही कमी होते. केस मजबूत आणि सुंदर होतात. तुम्हालाही लांब आणि चमकदार केस हवे असतील तर भोपळ्याच्या बियांचे नियमित सेवन करा.

## हे आहे हसण्याचे ५ फायदे...



आजच्या धावपळीच्या जीवनात कामाच्या दबावाखाली आम्ही विसरूनच जातो की आम्ही मनसोक्त केव्हा हसलो होतो. जेव्हाकी हसणे आम्हा सर्वांसाठी फारच महत्त्वाचे आहे, तरी ही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. हसण्याने आपले आयुष्य निरोगी आणि आनंदी राहत. म्हणून हसण्याच्या पाच फायद्यांबद्दल जाणून घेऊया.

१.हसण्याने हृदयाचा व्यायाम होतो. रक्त प्रवाह देखील चांगल्या प्रकारे होतो. हसताना, शरीरातून रासायनिक द्रव्य एंडॉर्फिन सोडले जाते. आणि हे द्रव्य आपल्या हृदयाला मजबूत बनवते. हसण्यामुळे हृदयविकाराची शक्यता कमी होते.

२.एका संशोधनानुसार, ऑक्सिजनच्या उपस्थितीत, कर्करोगाच्या पेशी आणि अनेक प्रकारचे हानिकारक जिवाणू आणि व्हायरस नष्ट होतात. हसण्याने आपल्याला अतिरिक्त ऑक्सिजन उपलब्ध होते आणि शरीराची रोगप्रतिकार शक्ती खूप मजबूत होते.

३.सकाळी जर हास्य ध्यान योग केले तर दिवसभर आपण आनंदी राहतो. जर रात्रीच्या वेळी केले तर आपल्याला चांगली झोप लागते. हास्य योगामुळे आपल्या शरीरात अनेक प्रकारच्या हार्मोन्सचा स्राव होतो, ज्यामुळे मधुमेह, पाठीचे दुखणे आणि तणावग्रस्त व्यक्तींना आराम मिळतो.

४.हसण्यामुळे सकारात्मक ऊर्जा देखील वाढते. सकाळी आनंदी राहण्याने ऑफिसचे वातावरण देखील आनंददायी होत. म्हणून मित्रांनो, आपण सर्वजण दोन किंवा चार चुटकुले वाचून आपल्या दिवसाची सुरुवात हसून करावी.

५.दररोज एक तास हसण्याने ४०० कॅलरीज ऊजार्चा वापर होतो, ज्यामुळे लठ्ठपणा देखील नियंत्रणात राहतो. आजकाल बरेच हास्यक्लब देखील तणावपूर्ण जीवनात हसण्याच्या माध्यमाने दूर करण्याचे काम करत आहे.

## डोळ्यांशी संबंधित समस्या तुम्हाला अंधत्व आणू शकतात



आपल्या ज्ञानेंद्रियांपैकी डोळे हे अतिशय महत्त्वाचे आणि नाजूक असतात. डोळ्यांबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा आपल्याला महागात पडू शकतो. आपल्या आहाराच्या सवयी आणि जीवनशैलीमुळे डोळ्यांच्या समस्या झपाट्याने वाढ तायात. डोळ्यांबाबत गांभीर राहण्याचा सल्लाही डॉक्टर अनेकदा देतात. डोळ्यांच्या कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष करू नये, असे डॉक्टरांकडून वारंवार सांगण्यात येते. कारण डोळे इतके संवेदनशील असतात की त्यांच्याशी संबंधित कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष केल्यास अंधत्व येऊ शकते. याच संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

**'या' समस्या उद्भवण्याची शक्यता**

**डोळयांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करू नका** – तज्ञांच्या मते डोळ्यांचा त्रास कोणत्याही वयात होऊ शकतो. त्यामुळे लहानपणापासूनच डोळ्यांकडे लक्ष देणं गरजेचं आहे. मुलांमध्ये ग्लूकोमाची समस्या झपाट्याने वाढत आहे, ज्यामुळे कालांतराने अंधत्वाचा धोका वाढू शकतो. इतकेच नाही तर वाढत्या वयाबरोबर होणारी मोतीबिंदूची समस्याही डोळ्यांची दृष्टी हिरावून घेते. त्यामुळे डोळ्यांशी संबंधित काही लक्षणे दिसल्यास सावध राहणं गरजेचं आहे.

**धूसर दृष्टी** – जर डोळे अंधुक दिसले तर ते अनेक प्रकारच्या समस्या आणि रोगांचे लक्षण असू शकते. काही प्रकरणांमध्ये, हे मोतीबिंदू किंवा लेन्स संबंधित समस्येमुळे देखील असू शकते. त्यामुळे तातडीने उपचार करावेत. तज्ञांच्या मते, बहुतेक मोतीबिंदू हे वयाबरोबर डोळ्यांमध्ये होणाऱ्या नैसर्गिक बदलांमुळे होतात, त्यामुळे वेळीच काळजी न घेतल्यास त्यांना अंधत्व येऊ शकते.

**डोळयांच्या मज्जातंतूंमध्ये समस्या** – डोळ्यांच्या मज्जातंतूंच्या समस्यांमुळेही अंधत्व येऊ शकते. यामुळे पाहण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. ग्लूकोमा हा असाच एक आजार आहे. हे डोळ्यांतील अनेक प्रकारचे आजार दर्शवते. ग्लूकोमासाठी कोणतीही निश्चित उपचार पद्धती नाही. मात्र, वेळेवर उपचार केल्याने ही समस्या दूर केली जाऊ शकते.

**डोळा दुखण्याची समस्या** – डोळ्यांच्या अनेक आजारांमुळे वेदना वाढू शकतात. डोळ्यांना दुखापत झाल्यामुळे वेदना होऊ शकतात. तज्ञांच्या मते, डोळे दुखणे म्हणजे डोळ्यांवर खूप दबाव निर्माण होतोय. हे देखील ग्लूकोमाचे लक्षण असू शकते. हा त्रास बराच काळ राहिल्यास डोळ्यांच्या डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करून घ्यावी. अन्यथा, यामुळे दृष्टी कमी होऊ शकते.

## चिकट पिवळा लंच बॉक्स स्वच्छ करण्यासाठी टिप्स



प्लॅस्टिकची भांडी असोत की जेवणाचा डबा, रोजच्या रोज डाळी, भाज्या, पराठे ठेवून त्यात तेल आणि मसाले जमा होतात. तेल आणि मसाल्याच्या डागांमुळे जेवणाचा डबा पिवळा होतो. रोज नीट साफही करता येत नाही. कधी कधी जेवणाचा डबाही तेल आणि मसाल्यांमुळे पिवळा पडतो. चिकट आणि पिवळा झालेला लंच बॉक्स स्वच्छ करण्यासाठी या टिप्स अवलंबवा.

**जेवणाचा डबा स्वच्छ करण्यासाठी लागणारे साहित्य** – २ टीस्पून कास्टिक सोडा, एका वाटीत दोन चमचे बेकिंग सोडा घ्या, २ चमचे डिश वॉश, ३ चमचे व्हिनेगर

**जेवणाचा डबा कसा स्वच्छ करायचा**

- जेवणाचा डबा साफ करण्यापूर्वी एका भांड्यात पाणी गरम करून त्यात २ चमचे बेकिंग सोडा आणि डिटर्जंट टाका.
- आता या मिश्रणात लंच बॉक्स,लीड आणि गॅस्केट टाका आणि अर्धा तास तसेच राहू द्या.
- तोपर्यंत एका भांड्यात २-४ चमचे बेकिंग सोडा, ३ चमचे लिक्विड डिश वॉश, ३ चमचे व्हिनेगर किंवा लिंबाचा रस मिसळा आणि पेस्ट तयार करा.
- अर्ध्या तासानंतर, सर्व जेवणाचे डबे, गास्केट आणि लीड काढा आणि स्क्रबरच्या साहाय्याने त्या सर्वांवर तयार केलेली पेस्ट लावा.
- आता १५ मिनिटे असेच राहू द्या, त्यानंतर टूथब्रश आणि स्क्रबरने घासून स्वच्छ करायला सुरू करा.
- चांगले घासल्याने सर्व घाण निघून जाईल. आता ते स्वच्छ पाण्याने धुवा आणि जेवणाचा डबा उन्हात वाळवा.
- बेकिंग सोडा आणि व्हिनेगर तुमच्या जेवणाच्या डब्यात साचलेली सर्व घाण साफ करेल आणि व्हिनेगरने जंतू देखील साफ होतील.

**जेवणाचा डबा साफ करताना काय करू नये**

- जेवणाचा डबा साफ करताना हातमोजे घाला कारण कॉस्टिक सोडा हा खूप हार्ड सोडा आहे, ज्याचा थेट वापर आपल्या हातांना हानी पोहोचवू शकतो.
- जेवणाचा डबा कोणत्याही हार्ड किंवा वायर स्क्रबरने स्वच्छ करू नका, अन्यथा ओरखडे येऊ शकतात.

## ५ ड्रायफ्रुट्स नियमीत खा भिजवून, शरीराला मिळतील द्विगुणीत फायदे

बदलत्या जीवनशैलीचा विचार करता आपल्या शरीराकरता ड्रायफ्रुट्स खाणे अत्यंत गरजेचे आहे. ड्रायफ्रुट्समध्ये मोठ्या प्रमाणात पौष्टिक घटक असतात. जे आपल्या शरीराला निरोगी ठेवण्याकरता उपयोगी पडतात. पण तुम्हाला माहित आहे का? जर हेच ड्रायफ्रुट आपण पाण्यात भिजवून मग खाल्ले तर त्यातील पौष्टीक घटक अजून वाढतात. या ड्रायफ्रुट्सचे जास्तीत जास्त फायदे भिजवून खाल्ल्यास मिळू शकतात. जाणून घेऊयात.

**बदाम** – बदाम रात्रभर भिजवून ठेवल्याने त्यातील फायदेशीर अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचे प्रमाण जास्त वाढते. भिजवलेल्या बदामात फायबरचे प्रमाण जास्त असते. यामुळे पचनक्रिया चांगली होण्यास मदत होते. सोबतच यात फॅट आणि प्रोटीनचे प्रमाण जास्त असते म्हणून भूक देखील कमी लागते आणि वजन नियंत्रणात राहते. बदामात असणारे अँटी-ऑक्सीडेंट आणि व्हिटॅमिन ए त्वचेकरता फायदेशीर ठरते. यामुळे बदाम भिजवून मगच खावेत.

**अक्रोड** – अक्रोड भिजवून ठेवल्याने ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि अँटीऑक्सिडंट्स सारख्या फायदेशीर घटकांची शरीरात मात्रा वाढते. अक्रोड रात्रभर पाण्यात भिजवा. सकाळी त्यातील पाणी काढून टाका आणि मग खावा. तुम्ही तीन ते चार तास देखील अक्रोड पाण्यात भिजवून ठेवून नंतर ते खाऊ शकता. अक्रोड तुमची मेंदूची शक्ती, स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढवण्यास मदत करतो.

**अंजीर** – अंजीर भिजवून खाल्ल्याने त्यात असणारे फायबर, कॅल्शियम आणि पोटॅशियम सारख्या फायदेशीर पोषक तत्वांची मात्रा शरीरात वाढते. रात्री झोपताना अंजीर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी उठल्यानंतर त्यातील सर्व पाणी काढून टाका. अंजीरमध्ये असणारे फायबर तुमचे चयापचन सुरळीत करण्यास मदत करेल. तर यात असणारे पोटॅशियम तुमच्या हाडांना मजबूत बनवेल. टाईप-२ डायबिटीज असलेले लोक भिजवलेले अंजीर खाऊन रक्तातील साखरेची पातळी कमी करू शकतात.

**मनुका** – मनुका भिजवल्याने त्याचे पौष्टिक मूल्य वाढते. भिजवल्याने ते आणखी गोड होते आणि त्यातील जीवनसत्त्वाचे प्रमाण वाढते. तर मनुक्यात फायबरचे प्रमाण जास्त असते. हे वाढलेले वजन कमी करण्यात प्रभावी ठरते.

**चिया सीड्स** – जेव्हा चिया बिया भिजवल्या जातात तेव्हा त्यातील प्रथिने, ओमेगा-३ आणि फायबरचे प्रमाण वाढते. जर तुम्ही चिया सीड्स पाण्यात भिजवून त्याचे सेवन केले तर ते तुमच्या हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. चिया सीड्समध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि अल्फा लिनोलेनिक ॲसिड हृदयासाठी फायदेशीर आहेत.




घर एक अशी जागा आहे जिथे लोक येतात आणि शांतता अनुभवतात. पण घर स्वच्छ असेल तरच छान दिसते. जरी आपण सर्वजण आपल्या घराची नियमित साफसफाई करतो, परंतु प्रत्येक कोपऱ्यात धूळ घालणे शक्य नाही. बऱ्याच वेळा आपण काही जागा जसेच्या तसे सोडतो, त्यामुळे तेथे धूळ आणि घाण साचू लागते.त्याला स्वच्छ करणे कठीण काम आहे. घराला डस्टफ्री ठेवण्यासाठी या टिप्स अवलंबवा

- **कार्पेटचा वापर कमी करा** – कार्पेट्स तुमच्या घराला सुंदर लुक देतात हे खरे आहे, पण त्यामध्ये धुळीचे कण मोठ्या प्रमाणात जमा होतात. अशा परिस्थितीत, त्यांना दररोज व्हॅक्यूम करणे आवश्यक आहे. म्हणूनच, घर धूळमुक्त ठेवायचे असेल, तर तेथे कार्पेट वापरणे टाळा. त्याऐवजी, आपण विनाइल कार्पेट वापरावे. आजकाल, खूप सुंदर विनाइल कार्पेट्स बाजारात उपलब्ध आहेत, जे तुमच्या फ्लोअरिंगला वेगळा लुक देतात आणि धूळ देखील दूर ठेवतात.
- **खिडक्या बंद ठेवा** – जर तुमचे घर अशा ठिकाणी असेल जिथून धूळ थेट घरात प्रवेश करते, तर तुमचे घर धूळमुक्त ठेवण्यासाठी, खिडक्या बंद ठेवणे खूप महत्वाचे आहे. आपण इच्छित असल्यास, आपण सकाळी लवकर किंवा रात्री उशिरा खिडक्या उघडू शकता. मात्र रहदारीच्या वेळी या खिडक्या उघडल्याने घरात अतिरिक्त धूळ येऊ शकते.
- **सजावटीकडे लक्ष द्या** – तुमच्या घरात धूळ कमी होऊ नये असे वाटत असेल तर सजावटीकडे पूर्ण लक्ष द्यावे. तुम्ही सजावटीच्या वस्तू निवडल्या पाहिजेत ज्या स्वच्छ करणे सोपे आहे आणि धूळ अडकण्याची किंवा साचण्याची शक्यता कमी आहे.
- **डोअरमॅट वापरा** – घरातील घाण आणि धुळीचे मुख्य कारण म्हणजे डोअरमॅट्स. म्हणून, आपल्या घराच्या प्रवेशद्वारावर डोअरमॅट्स वापरण्याची खात्री करा. यामुळे शूजमधील घाण आणि धूळ टाळण्यास खूप मदत होते.

## चांगल्या आरोग्यासाठी ड्रायफ्रुट्स खाताना काही गोष्टींकडेही लक्ष द्या



ड्रायफ्रुट्स हे शरीरासाठी फायदेशीर आहेत. ड्रायफ्रुट्समध्ये भरपूर जीवनसत्त्वं, लोह आणि फायबर असतात. तुम्हाला तुमचं आरोग्य तंदुरुस्त ठेवायचं असेल तर ड्रायफ्रुट्स खाणं हा सर्वात सोपा उपाय आहे. त्यामुळे पचनशक्तीही वाढते. पण आता प्रश्न पडतो की रोज ड्रायफ्रुट्स खाणं योग्य आहे का? जर एखाद्या व्यक्तीने ते दररोज खाल्ले तर त्याचा शरीरावर काय परिणाम होईल? तुमचं आरोग्य कसं बदलणं अपेक्षित आहे? यावर तज्ञांचं मत जाणून घेऊया.

**रोज ड्रायफ्रुट्स खाण्याचे फायदे**

इंडियन एक्स्प्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार, तुमच्या आहारात ड्रायफ्रुट्सचा समावेश करणं हा आरोग्यासाठी एक उत्तम उपाय आहे. कारण ड्रायफ्रुट्समध्ये भरपूर जीवनसत्त्वं, लोह आणि फायबर असतात. हे केवळ बीपी नियंत्रित करत नाही तर हृदयही निरोगी ठेवते. पचनासाठी आणि आतड्यासाठी ड्रायफ्रुट्स खूप चांगले आहेत, ते पोट देखील निरोगी ठेवते. जर तुम्ही नाश्त्यात ड्रायफ्रुट्स खाल्ले तर तो उत्तम परिपूर्ण नाश्ता ठरेल, यामुळे तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात पोषक गोष्टी मिळतात. यासोबत ड्रायफ्रुट्स खाल्ल्याने वजन देखील नियंत्रणात राहते. हे खाल्ल्यानंतर पोट भरल्यासारखं वाटतं. त्यामुळे निरोगी राहायचं असेल तर रोजच्या आहारात ड्रायफ्रुट्सचा समावेश करायला पाहिजे. ड्रायफ्रुट्समध्ये लोह आणि तांबे भरपूर प्रमाणात असतात. हे मेंदूच्या विकासासाठी देखील खूप चांगलं आहे. हे खाल्ल्यानंतर आपल्याला दिवसभर उत्साही वाटतं.

**ड्रायफ्रुट्स खात असाल तर जेवणात मीठ आणि साखरेचा वापर कमी करा**

जर तुम्ही रोज ड्रायफ्रुट्स खाल्ले तर तुमच्या आहारात साखर आणि मीठाचं प्रमाण कमी असावं, कारण त्यात कॅलरीज जास्त असतात. ड्रायफ्रुट्स तुम्ही जास्त खाऊ नये कारण त्यामुळे वजनही वाढू शकतं. जर तुम्ही दररोज ड्रायफ्रुट्स खात असाल तर ते कमी प्रमाणात खा. ड्रायफ्रूट्स तुमच्या आहारात पौष्टिक घटक वाढवत असतील तरी ते प्रमाणात खाल्ले पाहिजे. ड्रायफ्रूट्स खाताना तुम्हाला थोडा संयम राखण्याची गरज आहे, कारण यामुळे तुमचा बीपी देखील वाढू शकतो. जेव्हा तुम्ही ड्रायफ्रुट्स खाता तेव्हा एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की तुम्ही ते किती प्रमाणात खाता.

## ॲसिडिटी की हार्ट अटॅक



ॲसिडिटी होणं म्हणजे पित्त हा आजार तसा सामान्य आहे. दैनंदिन जीवनात चुकीचा आहार घेतल्यानं, अनियमित व्यायाम किंवा अपुरी झोप आदी कारणांमुळे पित्त किंवा ॲसिडिटीचा त्रास होतो.भूक नसताना जेवणे, मसालेदार अन्नपदार्थांचे सेवन, चहा किंवा कॉफीचे अतिसेवन आणि रात्री उशीरा जेवणे तसेच जेवल्यानंतर लगेच झोपणे अशा वाईट सवयी ॲसिडिटीस कारणीभूत ठरतात. काही औषधांमुळे छातीत जळजळ होते जसे की ॲंटीबायोटिक्स, आयन इत्यादी. ॲसिडिटी आणि हृदय विकाराची लक्षणे जवळपास सारखीच असतात. ही लक्षणे न टाळण्याजोगी असतात. त्यामुळे यातील फरक ओळखणे फार कठीण होते. ॲसिडीटीमध्ये छातीत जळजळ जाणवते. विशेषत, पोटाच्या वरच्या भागात ही जळजळ जास्त प्रमाणात होते. ॲसिडिटीमुळे तोंडात आंबट आणि कडू चव येते काही वेळेस उलट्याही होतात. हृदयविकाराच्या झटक्यात छातीत दुखते या वेदना छातीपासून मान,जबडा आणि पाठीपर्यंत पसरते. पोटात दुखणे, धाप लागणे, घाम येणे आणि चक्कर येणे अशी लक्षणे आहेत. हृदयाला पुरेसा रक्तपुरवठा न झाल्याने हा त्रास होतो.

**या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका**

- अस्वस्थतता वाटून भरपूर घाम येणे
- रक्तदाब कमी होणे अथवा खुप वाढणे
- जीव घाबरणे
- हात, जबडा इत्यादींमध्ये होणारी वेदना.
- अँटासिड्समुळे होणाऱ्या वेदना.
- असह्य वेदना होणे
- जोखीम घटकः जसे धूम्रपान, वाढते वय, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कोलेस्ट्रॉल

जेव्हा जेव्हा रुग्णाला वरील लक्षणे दिसतात तेव्हा ईसीजी आणि कार्डियाक तपासणी करण्याचा सल्ला दिला जातो. जर पहिला ईसीजी सामान्य असेल तर १० मिनिटांनंतर पुन्हा ईसीजी करावा. जेव्हा १२ तासांचा ईसीजी सामान्य असतो आणि एंजाइम वाढलेले नाहीत तेव्हाच हृदयविकाराचा झटका नाही असे स्पष्ट होते. असिडिटी आणि हृदयविकाराचा झटका यांच्या लक्षणांमध्ये साम्यता असली तरी वेळीच तज्ञांचा सल्ला घेणे, औषधोपचार करणे तसेच लक्षणांकडे दुर्लक्ष करु नये.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका वेळेतच होणार

### निवडणूक अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणेचा अध्यादेश काढणार - राज्य सरकारचा निर्णय

**■ बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज स्विकारणाऱ्या किंवा स्विकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाला जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले जात होते. मात्र यामुळे निवडणूक प्रक्रियेस विलंब होत असे. यावर महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४ (२) मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका वेळेत आणि कालबध्द रितीने व्हाव्यात या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातील कलम १४



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका वेळेत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मध्ये, पोट-कलम (२) अंतर्गत उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करता येत होते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अनेक अपीले प्रलंबित राहत असल्याने निवडणुका कालबद्धरित्या घेणे शक्य होत नसल्याने हा निर्णय घेण्यात आला.

याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासनास या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनास अशा निवडणुकांबाबत नियम करता येतील, तसेच उमेदवारी अर्ज (नामनिर्देशनपत्रे) स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल, अशी कलमे यात समाविष्ट करण्यात आली आहे.

---

दाट धुकं आणि कमी दृश्यमानतेमुळे अनेक विमानांची उड्डाणं रद्द...

## कसं असेल हवामान? आयएमडीने सांगितलं



**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईत थंडीचा कडाका कमी झाला आहे. मात्र रात्री आणि सकाळी गारवा कायम आहे. उत्तरेकडून येणाऱ्या शीत लहरी कमी झाल्या आहेत. त्यामुळे राज्यभरात थंडी काहीशी कमी झाली आहे. राज्यातील अनेक शहरांत १० अंशांखाली गेलेला तापमानाचा पारा आता वाढू लाहला आहे. मात्र मराठवाडा, विदर्भात थंडीची लाट कायम आहे. दिल्ली विमानतळावर दाट धुके आणि कमी दृश्यमानतेमुळे गुरुवारी विविध विमान कंपन्यांची २७ उड्डाणे रद्द करण्यात आली. यामध्ये जाणाऱ्या १६ आणि येणाऱ्या ११ विमानांचा समावेश होता. तसंच अनेक विमानांना विलंब झाला. दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडच्या (डीआयएएल) अधिकाऱ्याने ही माहिती दिली. 'कॅट-३' या 'इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टम'अंतर्गत (आयएलएस) विमानांना धुके, पाऊस किंवा बर्फाच्या परिस्थितीत ५० ते २०० मीटर रनवे व्हिज्युअल रेंज (आरव्हीआर) दृश्यमानतेमध्ये विमान उतरवले जाते. यासाठी वैमानिक विशेष प्रशिक्षण तसेच विमानही अनुकूल असणे आवश्यक असते. दरम्यान, राजधानी दिल्ली आणि परिसरात गुरुवारी सकाळी दाट धुक्याची चादर पसरल्याने दृश्यमानता लक्षणीयरित्या कमी झाली. परिणामी, संपूर्ण राष्ट्रीय राजधानी परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक सरासरी (एक्यूआय) ३७३ नोंदवला गेल्याने, हवेची गुणवत्ता 'अत्यंत खराब' श्रेणीत राहिली.

---

## २४ नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मतदान... मतमोजणी व निकाल रविवारी २१ डिसेंबर रोजी

**मतदान कुठे होणार मतदान?**

- ठाणे : अंबरनाथ
- अहिल्यानगर : कोपरगाव, देवळाली-प्रवरा, पाथर्डी आणि नेवासा
- पुणे : बारामती आणि फुरसुंगी-उरुळी देवाची
- सोलापूर :अनगर, मंगळवेढा
- सातारा : महाबळेश्वर, फलटण
- छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री
- नांदेड : मुखेड, धमार्बाद
- लातूर : निलंगा, रेणापूर
- हिंगोली : बसमत
- अमरावती : अंजनगाव सूर्जी
- अकोला : बाळापूर
- यवतमाळ : यवतमाळ
- वाशिम : वाशिम
- बुलढाणा : देऊळगावराजा
- वर्धा : देवळी
- चंद्रपूर : घुग्घूस

**■मुंबई । प्रतिनिधी,**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपिल दाखल झाल्याने राज्य निवडणूक आयोगाला स्थगित कराव्या लागलेल्या बारामती, अंबरनाथसह राज्यातील २४ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी शनिवारी (२० डिसेंबर) मतदान होणार असून ७६ नगरपालिका आणि नगरपंचायतीमधील नगरसेवक पदाच्या १५४ जागांसाठीही आज मतदान होत आहे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकीची तयारी पूर्ण केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपिल असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने संबंधित ठिकाणी सुधारित कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबविण्याचा निर्णय आयोगाने घेतला. निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार आज २४ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी आज सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच या दरम्यान मतदान होईल.

दरम्यान, याआधी २६४ नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती आणि ३ डिसेंबर रोजी निकाल लागणार होता. मात्र २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानावर याचा परिणाम होऊ शकतो, असे म्हणत नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना २६४ नगरपालिका आणि नगरपंचायतींचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार, आता २ डिसेंबर रोजी पार पडलेल्या २६४ नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या, तसेच आज होणाऱ्या २४ नगरपालिका आणि नगर पंचायतींची मतमोजणी रविवारी (२१ डिसेंबर) सकाळी १० वाजल्यापासून सुरू होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे.



---

## चंद्रपूर रोडवरील विस्तारित बुटीबोरी एमआयडीसीत स्फोट... ६ कामगारांचा मृत्यू



**■चंद्रपूर। प्रतिनिधी,**

चंद्रपूर रोडवरील विस्तारित बुटीबोरी एमआयडीसीतील 'अवाडा सोलर' कंपनीत शुक्रवारी सकाळी चाचणी सुरू असताना पाण्याची टाकी फुटल्याने सहा कामगारांचा मृत्यू झाला. तर अनेक कामगार जखमी झाले आहेत. दीड लाख लिटर क्षमतेच्या महाकाय पाण्याच्या टाकीचा हायड्रो चाचणीदरम्यान झालेला स्फोट इतका भीषण होता की, यात तीन मजुरांचा जागीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या तिघांचा कालांतराने मृत्यू झाला.मृतांमध्ये सुधांशु कुमार नागेश्वर साहणी, (वय ३६, मुझप्परपूर बिहार), बुलेटकुमार इंद्रजीत शहा (वय ३०, रा. मिश्रोली, सुहानी पश्चिम चंपारण बिहार), शमीम अन्सारी (४२, रा. मुझप्परपूर, बिहार), प्रकाश बिल्ला सहानी (ग्राम गवसरा मुझाप्परपूर बिहार), अन्वर अन्सारी, मुक्तार अन्सारी यांचा समावेश आहे. हे सर्व कामगार बिहारमधील आहेत. अन्य जखमीची नावे बाबूचंद प्रसाद, जाकीर हुसैन, इब्राहिम अन्सारी आणि नागपूरची मयुरी तुरक अशी आहेत. अवाडा कंपनीत झालेल्या दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांना उपचाराकरिता बुटीबोरी येथील माया हॉस्पिटल येथे आणल्याचे कळताच जखमी कामगारांच्या नातेवाईकांनी हॉस्पिटलमध्ये गर्दी केली होती. शुक्रवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास कंपनीत नवनिर्मित मेटॅलिक वॉटर टँकची चाचणी (हायड्रो टेस्टिंग) सुरू होती. दीड लाख लिटर पाण्याचा दाब पेलण्याची क्षमता तपासली जात असताना अचानक एक कानठळ्या बसवणारा आवाज झाला. पाण्याच्या प्रचंड दाबाने टाकीचा स्फोट झाला आणि जवळपास काम करणाऱ्या कामगारांच्या अंगावर पत्र्यांचा मलबा पडल्याने यात ३ कामगारांचा जागीच मृत्यू झाला.

---

## १३ तासांचा प्रवास ६ तासांत, २०२६ची डेडलाइन

### तरीही 'या' चौपदरी महामार्गाचं काम रखडलं, या मागील कारण तरी काय?



**बांधकाम टप्पे असे**

पनवेल-कासू - ४२.३, कासू-इंदापूर - ४२.३

(वरील दोन्ही टप्पे एनएचएआयकडून बांधकाम)

इंदापूर-वडपाले - २६.७५, वडपाले-भोगाव खुर्द - ३८.७६, भोगाव खुर्द-कशेडी - ८.९५, कशेडी-परशूराम - ४३.४३, परशूराम घाट-अरवली - ३४.४५, अरवली-कांटे - ३९.२४, कांटे-वाकेड - ४९.१५, वाकेड-तळगाव - ३३.२५, तळगाव-कळमठ - ३८.३८, कळमठ-झारप - ४३.९०

(केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडून वरील सर्व टप्प्यांचे बांधकाम)

**■मुंबई । प्रतिनिधी,**

बहुप्रतीक्षित व त्यामुळेच बहुचर्चित असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या विस्तारीकरणाला चार उड्डाणपूल व दोन बाह्यवळण रस्त्यांमुळे विलंब झाला आहे. हेच सहा 'स्पॉट' विद्यमान वाहनचालकांसाठी काही प्रमाणात त्रासदायक ठरतात, हे रस्ते वाहतूक मंत्रालयाचे अधिकारीही खासगीत मान्य करतात. त्यापैकी चार उड्डाणपुलांची कामे चार ते सहा महिन्यांत पूर्ण होतील, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मूळ मुंबई-गोवा महामागार्चे आता चौपदरीकरण होत आहे. त्यातील पनवेल-कासू-इंदापूर या ८४ किमीच्या टप्प्याचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) होत आहे. ते काम जवळपास पूर्ण झाले आहे. मात्र, महामार्गावरील खरा त्रास हा इंदापूरपासूनच सुरू होतो. इंदापूर ते झारप या जवळपास ४९० किमीच्या मागार्चा विस्तार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडून थेट सुरू आहे. त्यातील सर्वात मोठा अडथळा हा इंदापूर येथील तीन किमीचे बाह्यवळण व माणगाव येथील सात किमीचे बाह्यवळण हे आहे. हे दोन्ही बाह्यवळण मूळ कामाच्या कंत्राटाचा भाग असतानाही ते झाले नाही. त्यामुळे 'मॉर्थ'ने सहा महिन्यांपूर्वी नव्याने निविदा जाहीर केली. त्यानंतर आता ते काम सुरू झाले असून पूर्ण होण्यास किमान मार्च २०२७ उजाडणार आहे. यामुळेच इंदापूर व माणगाव, या भागातून हा महामार्ग ओलांडताना वाहतूककोंडीत वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असल्याची स्थिती आहे. माणगावपासून पुढे महामार्ग तसा चांगला आहे. परशुराम घाटापासून पुढे झारपपर्यंतचा जवळपास तयार आहे. मात्र लांजा, निवळी, पाली व संगमेश्वर या ठिकाणी उड्डाणपुलांची कामे सुरू असल्याचा फटका वाहनचालकांना दोन वर्षांपासून बसत आहे. आता येत्या मार्च २०२६ पर्यंत हे उड्डाणपूल बांधून पूर्ण होतील व त्यावरून वाहतूक सुरू होईल, असे मंत्रालयाच्यामहामार्ग अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

---

## कासा-सायवन-उधवा-संजाण रस्ता कामामुळे नागरिकांचे हाल

धरमपूर-सायवन-निंबापूर-उधवा या परिसरात रस्ता रुंदीकरणासाठी दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी रस्ता एकेरी करण्यात आल्याने सतत वाहतूक कोंडी होत असून, धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. परिणामी दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याच्या घटना वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.रस्त्याच्या कडेला खोल खड्डे, दगड-मातीचे ढीग, अर्धवट अवस्थेतील काम तसेच आवश्यक सूचना फलक आणि चेतावणी दिव्यांचा अभाव यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. अनेक ठिकाणी रस्त्याची स्पष्ट दिशा दिसून येत नसल्याने वाहनचालक गोंधळात सापडत आहेत.



**■डहाणू । प्रतिनिधी,**

डहाणू व तलासरी तालुक्यांना गुजरात सीमा तसेच मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाशी जोडर्णाया कासा-सायवन-उधवा-संजाण या अत्यंत महत्त्वाच्या सुमारे ५३ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या नूतनीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. मात्र, कामाच्या प्रारंभिक टप्प्यातच ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे नागरिक, शेतकरी आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हा रस्ता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अंतर्गत विकसित करण्यात येत असून, यासाठी तब्बल २६८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये ठेकेदाराला कायार्देश देण्यात आला असून, ३० महिन्यांत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. वाढवण बंदर प्रकल्पाशी जोडणारा हा मार्ग महत्त्वाचा असल्याने रस्त्याचे बळकटीकरण व काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. सध्या ५ मीटर रुंदी असलेल्या रस्त्याची रुंदी ७ मीटर, तर ७ मीटर रुंदी असलेल्या भागाची रुंदी १० मीटर करण्यात येणार असून, पुलांचे नूतनीकरणही या कामात समाविष्ट आहे, अशी माहिती संबंधित अधिर्कायांनी दिली. स्थानिक नागरिकांची ठाम मागणी आहे की, ठेकेदाराने तातडीने ठिकठिकाणी सूचना फलक लावावेत. वाहतूक नियंत्रणासाठी स्वयंसेवक किंवा कर्मचारी नेमावेत तसेच धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित पाण्याच्या टँकरची व्यवस्था करावी. अन्यथा अपघातांची मालिका अधिक गंभीर रूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

आधी इमारतीवरुन माकडासारख्या उड्या मारल्या अन् ४ तासाने...

## मुंबईतील दादरमध्ये तरुणाचा हायव्होल्टेज ड्रामा

**■डहाणू । प्रतिनिधी,**

मुंबईतील दादर रेल्वे स्थानक परिसरात शुक्रवारी पहाटे एका तरुणाने केलेल्या कृत्याने संपूर्ण प्रशासनाची झोप उडाल्याचे पाहायला मिळाले. एका विवस्त्र तरुणाने इमारतीवर चढून तब्बल चार तास हायव्होल्टेज ड्रामा केला. कधी इमारतीच्या सज्जावर बसणे, तर कधी एका इमारतीवरून दुसऱ्या इमारतीवर माकडासारख्या उड्या मारणे, अशा कृत्यामुळे प्रत्यक्षदर्शींच्या काळजाचा ठोका चुकला होता. अखेर अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नानंतर या तरुणाला सुरक्षितरित्या खाली उतरवण्यात यश आले आहे.

**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार, हा सर्व प्रकार पहाटेच्या ५.१५ च्या सुमारास सुरू झाला. दादर स्थानकाबाहेरील एका इमारतीवर हा तरुण चढल्याचे काही स्थानिकांच्या निदर्शनास आले. विशेष म्हणजे, या तरुणाच्या अंगावर कपडे नव्हते आणि तो अत्यंत विचित्र हालचाली करत होता. तो मानसिकदृष्ट्या खचलेला किंवा मनोरुग्ण असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते. घटनेचे गांभीर्य ओळखून नागरिकांनी तत्काळ पोलीस नियंत्रण कक्षाला आणि अग्निशमन दलाला फोन केला.

अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले तेव्हा हा तरुण इमारतीच्या मजल्यावरील सज्जावर उभा होता. यावेळी बचाव पथकाने त्याला खाली उतरवण्यासाठी शिडी लावली आणि त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मात्र जवान जवळ पोहोचताच तो तरुण माकडासारखा दुसऱ्या इमारतीच्या गॅलरीत उडी मारत होता. तो या कामात इतका सराईत वाटत होता की जवानांना त्याच्यापर्यंत पोहोचणे कठीण झाले होते.



**दादर पोलिसांकडून तपास सुरु**

तो तरुण खाली कोसळण्याची शक्यता असल्याने अग्निशमन दलाने खबरदारीचा उपाय म्हणून इमारतीजवळ मोठ्या जाळी पसरवली होती. जेणेकरून जर त्याने उडी मारली किंवा तो पडला, तर त्याला गंभीर इजा होऊ नये. यामुळे पोलीस आणि जवान त्याला सातत्याने शांत राहण्याचे आवाहन करत होते. सकाळी साधारण ९ वाजेपर्यंत हा थरार सुरू होता. पोलिसांनी त्याला विश्वासात घेतले आणि बराच वेळ समजावल्यानंतर अखेर तो तरुण शांत झाला. यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याला सुखरूप खाली उतरवले. प्राथमिक चौकशीत हा तरुण गतिमंद असावा, अशी माहिती समोर येत आहे. त्याला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. तो नेमका कुठून आला आणि इमारतीवर का चढला, याचा तपास दादर पोलीस करत आहेत.

---

## वसई-विरार शहरमध्ये महाविकास आघाडीत जागावाटपाचा तिढा कायम

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बहुजन विकास आघाडी (बविआ) आणि अन्य पक्षांनी एकत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, या आघाडीची औपचारिक घोषणा होऊनही जागावाटपावर अद्याप एकमत न झाल्याने राजकीय वतुर्ळात संभ्रमाचे वातावरण आहे. महाविकास आघाडीचे गणित कागदावर ठरल्याचे संकेत मिळत असले, तरी प्रत्यक्षात उमेदवार आणि प्रभागनिहाय जागावाटपाचे गणित गुंतागुंतीचे ठरत आहे. कोणत्या पक्षाला किती जागा, कोणत्या प्रभागात उमेदवारी, तसेच बंडखोरी टाळण्यासाठीची सूत्रे यावर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे 'आघाडीत मिठाचा खडा पडणार का?' असा सवाल उपस्थित होत आहे.



शुक्रवारी सायंकाळी शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते विनायक राऊत,मिलिंद नार्वेकर,विलास पोतनीस आणि मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. या भेटीत आघाडीच्या व्यापक राजकीय समीकरणांवर चर्चा झाल्याचे समजते. बैठकीनंतर आघाडीबाबत सकारात्मक वातावरण असल्याचे संकेत देण्यात आले असले, तरी जागावाटपावर ठोस निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही.

सूत्रांच्या दिलेल्या माहितीनुसार, प्रत्येक पक्ष आपल्या प्रभावी प्रभागांवर दावा करत असल्याने तडजोडीची प्रक्रिया संथगतीने सुरू आहे. काही प्रभागांमध्ये इच्छुकांची संख्या अधिक असल्याने उमेदवारीवरून अंतर्गत नाराजीचे सूर उमटत आहेत. आघाडी टिकवण्यासाठी वरिष्ठ पातळीवर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत असले तरी, ३० डिसेंबरला जागा वाटपाचा तिढा सोडवला जाईल असे विनायक राऊत आणि अविनाश जाधव यांनी बोलताना सांगितले.

---

## "महाराष्ट्र ड्रग्सच्या विळख्यात, तरीही गृहमंत्री गप्प का?" : सतेज पाटील

**म्नेमके प्रकरण काय?**

शनिवारी (दि. १३) पहाटे करण्यात आलेल्या छापेमारीदरम्यान क्राईम ब्रँचने ७ किलो ७१८ ग्रॅम एमडी ड्रग्स तसेच ३८ किलो द्रवरूप रसायने व कच्चा माल जप्त केला आहे. बाजारभावानुसार या मुद्देमालाची किंमत सुमारे १५ कोटी रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी तीन बांगलादेशी नागरिकांसह चौघांना अटक करण्यात आली असून, तिघे आरोपी ड्रग्स निर्मितीसाठी कारागीर म्हणून काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. दिवसभर चाललेल्या कारवाईनंतर सर्व आरोपींना पुढील तपासासाठी मुंबईला रवाना करण्यात आले आहे. या कारखान्याची माहिती स्थानिक पोलिसांना नसणे ही गंभीर बाब मानली जात असून, या प्रकरणामुळे यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच या ड्रग्स कारखान्याचे काही राजकीय संबंध असल्याचे आरोपही पुढे येत असून, त्यामुळे प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे. मुंबई क्राईम ब्रँचने या प्रकरणात आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय कनेक्शनचा तपास सुरु केला असून, या ड्रग्स रॅकेटमागील संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी तपास वेगाने सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँचने मोठी कारवाई करत सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील सावली गावात एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स तयार करणारा कारखाना (१३ डिसेंबर) उद्ध्वस्त केला. धक्कादायक बाब म्हणजे हा कारखाना चक्क एका म्हशीच्या गोठ्यात सुरू होता.

या कारवाईमुळे जिल्ह्यासह राज्यभरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, या घटनेवर काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे."वोटचोरी करून सत्तेवर बसलेले फडणवीसझशिंदेझ पवार सरकार महाराष्ट्राला "उडता महाराष्ट्र" बनवण्याच्या दिशेने चालले आहे का? गृहमंत्री अद्याप गप्प का? असा सवाल सतेज पाटील यांनी उपस्थित केला आहे.

सतेज पाटील म्हणाले, "साताऱ्यात उघडकीस आलेल्या ड्रग्स निर्मिती केंद्रात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी संबंधित व्यक्तींचा सहभाग समोर आल्याने, या काळ्या धंद्याला राजकीय संरक्षण मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे."

पुढे ते म्हणाले, "महाराष्ट्रातील वाढत्या ड्र्ग्ज प्रकरणात मी उन्हाळी अधिवेशनात आवाज उठवून महाराष्ट्राला नशामुक्त करण्याची कळकळीची मागणी केली होती. मात्र सत्तेची नशा चढलेल्या राज्यकर्त्यांना राज्यातील युवा पिढीचे भविष्य जपण्यापेक्षा, त्यांच्या गोरखधंद्यांचे संरक्षण करण्यातच अधिक स्वारस्य असल्याचे दुर्दैवी चित्र स्पष्ट झाले."

"महाराष्ट्राला ड्रग्सच्या विळख्यात लोटणाऱ्या या अत्यंत गंभीर घटनेवर गृहमंत्री अद्याप गप्प का आहेत?" असा प्रश्न उपस्थित करत 'या प्रकरणावर तातडीने खुलासा करून निष्पक्ष चौकशी व कठोर कारवाई करणे ही सरकारची जबाबदारी आहे." असे मत सतेज पाटील यांनी व्यक्त केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com